मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

दैनिक **युवक आधार** मराठी

तरुणांचा बुलंद आवाज

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २२२ ■ गुरुवार, २३ एप्रिल २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




# वसुंधरा दिनानिमित्त ‘वसुंधरा रक्षक अभियान’ आणि ‘महा-आरपीईटी’ अभियानाचा शुभारंभ

## पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येक नागरिकाने ‘वसुंधरा रक्षक’ची भूमिका बजावावी — पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे

**मुंबई :** वाढते प्रदूषण, बदलते हवामान आणि वेगाने होणारे शहरीकरण या पार्श्वभूमीवर पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येक नागरिकाने ‘वसुंधरा रक्षक’ म्हणून पुढे यावे, असे आवाहन राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी केले. ‘वसुंधरा रक्षक’ ही संकल्पना केवळ उपक्रम नसून ती जनआंदोलन बनवण्याचा संकल्प त्यांनी यावेळी व्यक्त केला.

जागतिक वसुंधरा दिनानिमित्त राज्य शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागातर्फे आयोजित समारंभात पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते ‘वसुंधरा रक्षक अभियान २०२६’, ‘महा-आरपीईटी’ अभियान, राज्य वातावरणीय कृती कक्षाच्या संकेतस्थळाचे अनावरण तसेच ‘इमिशन ट्रेडिंग स्कीम’ प्रशिक्षणाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी ‘वसुंधरा रक्षक’ अभियानाच्या लोगोचेही अनावरण करण्यात आले. या लोगोची निर्मिती स्वतः मंत्री पंकजा मुंडे यांनी केली आहे.

यावेळी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम आणि विभागाच्या सचिव जयश्री भोज यांच्यासह कोकाकोला कंपनीचे वरिष्ठ अधिकारी, विविध संस्थांचे प्रतिनिधी तसेच विविध महाविद्यालयांचे विद्यार्थी उपस्थित होते.

‘वसुंधरा रक्षक’ या संकल्पनेला मातृत्वाची जोड देत मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, वसुंधरा म्हणजे केवळ पृथ्वी नव्हे, तर आपली आई आहे. तिचे संरक्षण करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. विकास, औद्योगिकीकरण आणि जागतिकीकरणाबरोबर प्रदूषणही वाढत आहे. त्यामुळे संतुलित विकासाचा मार्ग स्वीकारत पर्यावरण रक्षणासाठी ठोस पावले उचलावी लागतील.

‘वसुंधरा रक्षक’ अभियानाच्या माध्यमातून राज्यभर छत्रपती शिवाजी महाराजांच्या मावळ्यांसारखे ‘वसुंधरा वॉरियर्स’ तयार केले जाणार आहेत. गावागावांत, वॉर्डावॉर्डात ही चळवळ पोहोचली पाहिजे. हे रक्षक प्रदूषणाविरुद्ध लढतील. प्रत्येक नागरिकाने झाडे लावणे, कचरा वर्गीकरण करणे, प्लास्टिकचा वापर कमी करणे अशा कृतींमधून आपला वाटा उचलावा, असे आवाहनही त्यांनी केले.

प्रदूषणाचा परिणाम प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय त्याची तीव्रता जाणवत नाही. लोकांच्या आरोग्यावर होणारे परिणाम पाहून बदलाची गरज अधिक प्रकर्षाने जाणवत असल्याचे सांगून, आजच्या पिढीला पर्यावरणातील बदल समजावून सांगण्यासाठी ‘आज-काल-उद्या’ या संकल्पनेवर आधारित माहिती आणि डेटा उपलब्ध करून दिला जाईल, असे त्यांनी नमूद केले. आजची पिढी तंत्रज्ञानात पुढे असली तरी पर्यावरणाची जाणीवही तितकीच महत्त्वाची आहे. पुढील पिढीला संपत्ती नव्हे, तर स्वच्छ हवा आणि पाणी देणे ही आपली जबाबदारी आहे.‘महा-आरपीईटी’ अभियानाबाबत मंत्री पंकजा मुंडे यांनी प्लास्टिक कचऱ्याच्या पुनर्वापरावर भर देत ‘रिड्यूस, रियूज, रिसायकल आणि रिथिंक’ या तत्त्वांचा अवलंब करण्याचे आवाहन केले. अनावश्यक पॅकेजिंग कमी करणे, वस्तूंचा पुनर्वापर करणे आणि पुनर्निर्मितीला प्राधान्य देणे ही काळाची गरज आहे. प्लास्टिकच्या बाटल्या गोळा करून त्यांचा उत्पादकांकडून पुनर्वापर करण्याची संकल्पना पर्यावरणपूरक आणि आर्थिकदृष्ट्या फायदेशीर आहे. राज्यात अशा प्रकारचा उपक्रम राबवणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असल्याचेही त्यांनी नमूद केले.



औद्योगिक प्रदूषण नियंत्रणासाठी राबविण्यात येणाऱ्या ‘इमिशन ट्रेडिंग स्कीम’बाबत मंत्री मुंडे यांनी सांगितले की, कार्बन ट्रेडिंगप्रमाणेच सल्फर डायऑक्साइड उत्सर्जन नियंत्रणासाठी ही योजना महत्त्वाची आहे. उद्योगांनी उत्सर्जन कमी करण्यासाठी परस्पर सहकार्याचा मार्ग स्वीकारल्यास पर्यावरण संरक्षणाला चालना मिळेल.

**वसुंधरा रक्षक व्हॉट्सॲप कम्युनिटीमुळे तरुणांपर्यंत संदेश प्रभावीपणे पोहोचेल — सिद्धेश कदम**

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम यांनी सांगितले की, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या नेतृत्वाखाली राज्यात विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले जात असून त्याची सुरुवात आजच्या कार्यक्रमातून होत आहे. ‘वसुंधरा रक्षक’ व्हॉट्सॲप कम्युनिटीसारख्या उपक्रमांमुळे विशेषतः तरुणांपर्यंत पर्यावरणविषयक संदेश प्रभावीपणे पोहोचवला जाईल.

‘महा-आरपीईटी’ धोरणांतर्गत उत्पादकांनी स्वतः निर्माण केलेल्या प्लास्टिकचा पुनर्वापर करण्याची जबाबदारी स्वीकारणे ही महत्त्वाची पायरी आहे. हा उपक्रम देशातच नव्हे तर जगातही आगळावेगळा असल्याचे त्यांनी नमूद केले.

देशातील पहिली सल्फर डायऑक्साइड ‘इमिशन ट्रेडिंग’ योजना महाराष्ट्रात सुरू होत असल्याचा अभिमान त्यांनी व्यक्त केला. सध्या राज्यातील सुमारे १०० उद्योग या प्लॅटफॉर्मवर सहभागी झाले असून भविष्यात याचा विस्तार करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

पर्यावरण संरक्षणासाठी डेटा व कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) यांचा वापर पुढील काळात करण्यात येणार आहे. प्रशासनासोबतच उत्पादक आणि नागरिकांनीही आपली जबाबदारी ओळखून पर्यावरण संवर्धनासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

प्रास्ताविकात पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज यांनी सांगितले की, जागतिक वसुंधरा दिन हा केवळ निसर्गाशी संबंधित विषय नसून तो सार्वजनिक आरोग्य, जीवनमान, शाश्वत विकास आणि पुढील पिढीच्या भवितव्याशी थेट संबंधित आहे. आजचा दिवस आपल्याला थांबून विचार करण्याची आणि अधिक हरित व जबाबदार भविष्यासाठी आपली बांधिलकी दृढ करण्याची संधी देतो.

‘महा-आरपीईटी’ अभियान हे प्लास्टिक कचरा व्यवस्थापन मजबूत करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल आहे. ‘वसुंधरा रक्षक’ उपक्रमाद्वारे विद्यार्थी, तरुण, महिला आणि नागरिकांना शाश्वत जीवनशैलीशी जोडण्याचा प्रयत्न केला जात आहे.

‘अवर पॉवर, अवर प्लॅनेट’ या यंदाच्या संकल्पनेचा उल्लेख करत त्यांनी पर्यावरण संरक्षणाची खरी ताकद केवळ धोरणांत नसून नागरिक, संस्था आणि समाजाच्या दैनंदिन निर्णयांमध्ये दडलेली असल्याचे स्पष्ट केले.

**वसुंधरा रक्षक व्हॉट्सॲप कम्युनिटीची सुरुवात**

वसुंधरा रक्षक अभियानांतर्गत ‘वसुंधरा रक्षक’ व्हॉट्सॲप कम्युनिटी तयार करण्यात आली आहे. या कम्युनिटीद्वारे नागरिकांना या अभियानात सहभागी होता येणार आहे. कार्यक्रमात क्यूआर कोडच्या माध्यमातून मंत्री पंकजा मुंडे, एमपीसीबीचे अध्यक्ष सिद्धेश कदम व सचिव जयश्री भोज यांनी या कम्युनिटीमध्ये सहभागी होत ‘वसुंधरा रक्षक’ झाल्याची नोंद केली. या अभियानाच्या लिंक व क्यूआर कोडद्वारे सर्व नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन मंत्री पंकजा मुंडे यांनी केले.

संजय भुस्कुटे यांनी सूत्रसंचालन केले, तर वातावरणीय बदल कक्षाचे संचालक अभिजित घोरपडे यांनी स्वागत केले.

## पनवेलमध्ये ‘युवा शक्ती जागर’ यात्रेला तरुणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद; कृष्णराज महाडिक यांचा कार्यकर्त्यांशी थेट संवाद

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने आयोजित 'युवा शक्ती जागर' यात्रेच्या निमित्ताने पनवेलमध्ये तरुणाईचा महाकुंभ पाहायला मिळाला. या यात्रेचे नेतृत्व करत असलेले भाजप युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांनी पनवेलमधील मार्केटयार्ड येथील बैठकीत बोलताना लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, नगरसेवक परेश ठाकूर आणि परिवाराच्या कार्याचा गौरव केला. "ठाकूर परिवाराने प्रगत आणि पावन केलेली ही भूमी म्हणजे पनवेल आहे," अशा शब्दांत त्यांनी आपला



आदर व्यक्त केला. यावेळी कार्यकर्त्यांशी संवाद साधताना त्यांनी अतिशय नम्र भूमिका घेत सांगितले की, "मी आज प्रदेशाध्यक्ष असलो तरी तुमच्या बरोबरीने खांद्याला खांदा लावून काम करणार आहे. मला तुमच्याकडूनही खूप काही शिकायचे आहे. आपण सर्वांनी मिळून युवा मोर्चाचे एक मजबूत संघटन उभे करूया. तरुणांनी विविध क्षेत्रांत काम करण्याचे धाडस दाखवले पाहिजे आणि मी तुमच्यासोबत प्रदेशाध्यक्ष म्हणून नाही, तर एक मित्र म्हणून सदैव पाठीशी उभा राहीन. अशी ग्वाही त्यांनी दिली


मंगळवार २१ एप्रिल रोजी ही यात्रा पनवेलमध्ये दाखल झाली. यात्रेचे स्वागत गार्डन हॉटेलपासून काढण्यात आलेल्या एका भव्य बाईक रॅलीने करण्यात आले, ज्यामध्ये शेकडो तरुण उत्साहाने सहभागी झाले होते. रॅलीदरम्यान भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकास अभिवादन करण्यात आले. त्यानंतर श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ हॉल येथे भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचा विशेष संवाद मेळावा पार पडला, ज्यामध्ये आगामी काळातील संघटनात्मक बांधणीवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या दौऱ्याचे मुख्य आकर्षण ठरले ते म्हणजे वडाळे तलाव येथे आयोजित केलेला 'मीट-अप विथ के. एम.' हा कार्यक्रम. या विशेष सत्रात कृष्णराज महाडिक यांनी तरुण पिढी आणि सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्ससोबत थेट संवाद साधला, ज्यामुळे तरुणांमध्ये एक वेगळीच ऊर्जा पाहायला मिळाली. संपूर्ण जागर यात्रेच्या माध्यमातून युवकांना संघटित करून त्यांच्यामध्ये नवीन राजकीय आणि सामाजिक चेतना निर्माण करण्याचा प्रयत्न भारतीय जनता युवा मोर्चाकडून यशस्वीपणे करण्यात आला.

## भेंडखळजवळ कॉनएक्स CFS ला आग ; सलग घटनांनी सुरक्षा प्रश्न ऐरणीवर

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** उरण तालुक्यातील भेंडखळ गावाजवळील कॉनएक्स CFS (Con-ex CFS) येथे आज सकाळी सुमारे साडेनऊ वाजण्याच्या सुमारास आग लागल्याची घटना घडली. या आगीत काही प्रमाणात माल जळाल्याची प्राथमिक माहिती मिळत असून, सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल व सिव्हिल डिफेन्सची टीम तातडीने घटनास्थळी दाखल झाली. त्यांनी वेळेवर कारवाई करत आग आटोक्यात आणण्यात यश मिळवले. आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, संबंधित यंत्रणांकडून तपास सुरू आहे.दरम्यान, दोन दिवसांपूर्वी गव्हाणफाटा येथील जेडब्ल्यूआर गोदामाला आग लागल्याची घटना घडली होती. त्यानंतर लगेचच ही दुसरी घटना घडल्याने उरण तालुक्यातील गोदामांमधील सुरक्षेबाबत प्रश्नचिन्ह



निर्माण झाले आहे.तालुक्यातील काही ठिकाणी बेकायदेशीररित्या उभारण्यात आलेल्या गोदामांमध्ये सुरक्षा नियमांचे पालन होत नसल्याची चर्चा असून, यामुळे भविष्यात गंभीर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यावर तातडीने लक्ष देऊन अशा गोदामांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## थोर समाजसुधारक जनार्दन भगत यांच्या पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन; २३ एप्रिलला नियोजन बैठक

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** थोर समाजसुधारक स्वर्गीय जनार्दन भगत साहेब यांच्या ३८ व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमाच्या नियोजनासाठी महत्त्वपूर्ण बैठक गुरुवार दिनांक २३ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आली आहे.




ही बैठक सायंकाळी ५ वाजता उलवे नोड मधील सेक्टर १२ येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली आणि आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांच्या प्रमुख उपस्थित होणार आहे.जनार्दन भगत यांच्या पुण्यतिथीनिमित्त होणारा कार्यक्रम श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने साजरा करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे सुयोग्य नियोजन करण्यासाठी ही बैठक आयोजित करण्यात आली आहे. तरी संबंधितांनी या बैठकीस उपस्थित रहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## शकुंतला गॅस एजन्सीचे लायसन्स निलंबित; तक्रारी व पोलखोलीनंतर कारवाई

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** शहरातील शकुंतला गॅस एजन्सीचे लायसन्स भारत गॅसकडून निलंबित करण्यात आले असून, सदर एजन्सीचा गॅस पुरवठा बंद करण्यात आला आहे. ग्राहकांच्या वारंवार येणाऱ्या तक्रारी तसेच स्थानिक पत्रकारांनी केलेल्या सातत्यपूर्ण पोलखोलीनंतर प्रशासनाने ही कारवाई केल्याची माहिती समोर आली आहे.

तहसीलदार उद्धव कदम यांनी दिलेल्या माहितीनुसार, एजन्सीच्या कामकाजाबाबत अनेक गंभीर तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्या अनुषंगाने तपास करून संबंधित एजन्सीवर कारवाई करण्यात आली आहे.ग्राहकांची गैरसोय होऊ नये यासाठी तातडीने पर्यायी व्यवस्था करण्यात आली असून, शकुंतला गॅस एजन्सीतील सर्व ग्राहकांचे गॅस कनेक्शन पनवेल गॅस एजन्सी तसेच सुविधा गॅस एजन्सी, पनवेल यांच्याकडे वर्ग करण्यात आले आहे. ग्राहकांनी गॅस बुकिंग करताना आपला जुना कंझ्युमर नंबरच वापरावा, अशी सूचना देण्यात आली आहे. तसेच गॅस सिलेंडरची घरपोच




सेवा पूर्ववत सुरू राहणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.दरम्यान, या कारवाईनंतर तरी गॅस पुरवठा सुरळीत व वेळेवर व्हावा, अशी मागणी ग्राहकांकडून जोर धरू लागली आहे. वारंवार होणाऱ्या गैरसोयीमुळे त्रस्त झालेल्या नागरिकांना आता नियमित आणि विश्वासार्ह सेवा मिळावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## ओबीसीच्या हक्कांवर गदा सहन केली जाणार नाही – मनीषाताई निंबार्ते, जिल्हा परिषद सदस्य

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे/लाखनी -** भंडारा जिल्ह्यात ओबीसी जनगणनेच्या मुद्द्यावर राजकीय वातावरण तापले असून, जिल्हा परिषद सदस्यांनी भाजप सरकारवर जोरदार हल्लाबोल करत तीव्र भूमिका मांडली आहे. "ओबीसी समाजाच्या हक्कांची पायमल्ली करून राजकारण करणाऱ्यांना जनता कधीच माफ करणार नाही," असा थेट इशारा त्यांनी दिला.

जिल्हा परिषद सदस्य म्हणाल्या की, देशात अनेक वर्षांपासून ओबीसी समाज आपल्या लोकसंख्येच्या अचूक नोंदीसाठी आणि न्याय्य हक्कांसाठी लढा देत आहे. मात्र केंद्रातील भारतीय जनता पार्टी सरकारने ओबीसी जनगणनेचा प्रश्न जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवला आहे. "ही केवळ प्रशासनिक चूक नसून, हा सामाजिक अन्याय आहे," असे त्यांनी ठामपणे सांगितले.

"ओबीसी जनगणना झाली तरच समाजाच्या वास्तविक परिस्थितीचे चित्र समोर येईल. शिक्षण, रोजगार आणि आरक्षणाच्या बाबतीत योग्य धोरणे ठरवता येतील. पण भाजप सरकारला सत्य समोर येऊ द्यायचे नाही," असा गंभीर आरोप त्यांनी केला.त्या पुढे म्हणाल्या की , "ओबीसी समाज



हा देशाचा कणा आहे. त्यांच्या हक्कांवर कुणीही गदा आणण्याचा प्रयत्न केला, तर आम्ही रस्त्यावर उतरून संघर्ष करू. हा केवळ राजकीय मुद्दा नाही, तर अस्तित्वाचा लढा आहे."

यावेळी त्यांनी राज्य आणि केंद्र सरकारला तात्काळ ओबीसी जनगणना जाहीर करण्याची मागणी केली. "फक्त आश्वासने देऊन चालणार नाहीत. ठोस निर्णय घ्यावा लागेल, अन्यथा येणाऱ्या निवडणुकांमध्ये जनता योग्य उत्तर देईल," असा इशाराही त्यांनी दिला.

जिल्ह्यातील विविध ओबीसी संघटनांनीही या भूमिकेला समर्थन दर्शवले असून, लवकरच मोठ्या आंदोलनाची हाक दिली जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे आगामी काळात हा मुद्दा अधिकच पेट घेण्याची चिन्हे आहेत.

# सुप्रसिद्ध गायक पद्मश्री कैलाश खेर यांच्या लाईव्ह कन्सर्टने रसिक मंत्रमुग्ध

### तीन दिवसीय कुंवारा भिवसेन आदिवासी लोककला व सांस्कृतिक महोत्सवाचा समारोप

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक नागपूर विभाग** : मैं तो तेरे प्यार मे दिवाना हो गया... तोबा तोबा अशा एकाहून एक गीतांनी पद्मश्री कैलाश खेर यांनी नागपूर जिल्ह्यातील नागरिकांची मने जिंकली. यावेळी नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पारशिवणी मैदान येथे दिनांक १८ ते २० एप्रिल या तीन दिवसीय महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवाचा समारोप आज करण्यात आला. कार्यक्रमाला महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर



बावनकुळे वित्त व नियोजन राज्यमंत्री आशिष जयस्वाल, पारशिवनी नगराध्यक्ष सुनीता डोमकी, रामटेक नगराध्यक्ष बीकेंद्र महाजन, उपविभागीय अधिकारी प्रियेश महाजन आदी यावेळी उपस्थित होते.

यावेळी बोलताना राज्यमंत्री ॲड . आशिष जयस्वाल म्हणाले की महोत्सवाला तरुणाई मोठ्या प्रमाणात उपस्थित आहे. खूप चांगला प्रतिसाद मिळाला आहे. कैलाश खेर रामटकेवर अल्बम तयार करीत आहेत. घोगरा महादेव हे नवीन तीर्थक्षेत्र म्हणून विकसित झाले आहे. त्याला भेट ते देणार असल्याचे वित्त व नियोजन मंत्री ॲड. आशिष जयस्वाल यावेळी म्हणाले

पारशिवणी मैदान येथे दिनांक १८ ते २० एप्रिल या तीन दिवसीय महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यात सुप्रसिद्ध गायिका सन्मुखा प्रिया, प्रसिद्ध सिनेअभिनेत्री पद्मश्री सन्मानित हेमा मालिनी यांनी द्रौपदी महानाट्य मधील नृत्य सादरीकरणातून रसिकांना खिळवून ठेवले. शेवटच्या दिवशी सुप्रसिद्ध गायक पद्मश्री कैलाश खेर यांचा लाईव्ह कॉन्सर्ट आयोजित करण्यात आली. त्यापुर्वी आदिवासी समाजासाठी काम करणारा समाजबांधवांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

आदिवासी समाजाची कला, संस्कृती आणि परंपरा ही आपल्या महाराष्ट्राच्या अस्मितेचा महत्त्वाचा भाग आहे.

या कार्यक्रमात विविध आदिवासी नृत्यप्रकार, लोककला सादरीकरणे, पारंपरिक वेशभूषा, तसेच सांस्कृतिक उपक्रमांचा समावेश आहे. केवळ मनोरंजनापुरता मर्यादित नसून, आदिवासी संस्कृतीचे जतन, संवर्धन आणि पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्याचा एक महत्त्वपूर्ण प्रयत्न ठरले.

## मान्सूनपूर्व देखभालीसाठी विविध भागांत आज वीज बंद

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक नागपूर विभाग :** मान्सूनपूर्व देखभाल व दुरुस्तीच्या कामांकरिता महावितरणतर्फे शहरातील विविध वीज वाहिन्यांवरील वीजपुरवठा बुधवार, २२ एप्रिल रोजी काही तासांसाठी बंद ठेवण्यात येणार आहे. यामध्ये कॉंग्रेस नगर, सिव्हील लाईन्स, महाल, गांधीबाग आणि बुटीबोरी विभागातील भागांचा समावेश आहे.

कॉंग्रेस नगर विभागातील साई नगर १ व २, गिरीबालाजी नगर, सावरबांधे लेआउट, आम्रपाली नगर, पवार नगर, सलईगोदनी, नवेगाव, निंबा, आणि धामणा भागात सकाळी ८:३० ते १२ वाजेपर्यंत वीज नसेल. व्यंकटेश सिटी, गौरी मिडास, आयटीआय कॉलनी, निवास सोसायटी, रमेश इस्टेट, ओशियन सुपर सिटी, पिरॅमिड ४, माऊली ७, ग्लोरिअस प्लाझा, आरंभ लेआउट, सोहम आणि ओझेन भागात सकाळी ८ ते ११:३० या वेळेत वीज खंडित राहील. दीनदयाल नगर, स्वावलंबी नगर, सरस्वती लेआऊट, जीवनछाया सोसायटी परिसरात सकाळी ८ ते ११, तर अमेया वाहिनीवर सकाळी ८:३० ते १२ वाजेपर्यंत पुरवठा बंद राहील. आरपीटीएस रोड, लक्ष्मीनगर, शिवाजी पार्क आणि धरमपेठ एक्सटेंशनमध्ये सकाळी ७:३० ते ११, तर टिळकनगर, गोकुळपेठ, वाल्मिकीनगर व कॅनॉल रोड भागात सकाळी ८ ते १२ या वेळेत वीज नसेल.

प्रसाद नगर, आनंद नगर, टाकळी सिम, यशोधन नगर, रेणुका माता मंदिर, हिंगणा टी पॉईंट, प्रतापनगर पोलीस स्टेशन, त्रिमुर्तीनगर, भामटी, उज्ज्वल नगर, पावनभूमी, सोमलवाडा चौक आणि वंदना अपार्टमेंटसह लगतच्या परिसरात सकाळी ८ ते ११ या वेळेत वीजपुरवठा खंडित राहणार आहे. सिव्हील लाईन्स विभागातील आकार नगर, स्वामी कॉलनी, जगदीश नगर, प्रेरणा नगर, गंगा नगर, वीर चक्र कॉलनी, एम.बी. स्टेट आणि रक्षा कॉलनी भागात सकाळी ८ ते ११ वाजेपर्यंत दुरुस्तीचे काम चालेल.

महाल विभागातील महाल चौक, पुस्तक बाजार, कल्याणेश्वर मंदिर, झेंडा चौक, संघ बिल्डिंग परिसर आणि केळीबाग रोडवर सकाळी ७:३० ते १०:३० या वेळेत वीज नसेल. गांधीबाग विभागातील शिव नगर, घटाटे नगर, पुनापूर भागात सकाळी ८ ते १०, तर भंडारा रोडवरील श्याम नगर आणि नवीन नगर भागात सकाळी १० ते १२ या वेळेत वीज बंद राहील.

बुटीबोरी विभागातील भिवसेन खोरी, उत्कर्ष, वुडलँड सोसायटी, कृषक महिला भागात सकाळी ७ ते १०, तर हिंगणा-२ वाहिनीवरील औद्योगिक क्षेत्रातील डी-सेक्शन व संदीप मेटल परिसरात सकाळी ७:३० ते १२ वाजेपर्यंत वीज खंडित राहील. याव्यतिरिक्त, अपरेल पार्क उपकेंद्रातील कामामुळे ए, सी, डी, टी आणि आयसी झोनसह फूड पार्क परिसरातील औद्योगिक ग्राहकांचा वीजपुरवठा सकाळी ९ वाजल्यापासून बंद ठेवण्यात येणार आहे.

## ऊर्जा क्षेत्रात महामानवांचा जागर 23 एप्रिलला ; संजय आवटे यांचे प्रबोधन

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक नागपूर विभाग :** समता, न्याय आणि बंधुत्वाचा विचार जनमानसात रुजवणारे महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 135 वी जयंती आणि क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची 199 वी जयंती या निमित्ताने नागपूर येथील महावितरण व महापारेषण परिमंडळाच्या वतीने भव्य 'संयुक्त जयंती महोत्सवाचे' आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात प्रख्यात पत्रकार व विचारवंत संजय आवटे यांच्या प्रमुख व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले असून, त्यांच्या प्रबोधनातून महामानवांच्या विचारांचा जागर होणार आहे.

गुरुवार 23 एप्रिल 2026 रोजी सायंकाळी 5:30 वाजता गड्डीगोदाम येथील महावितरणच्या 'प्रकाश भवन' प्रांगणात पार पडणार आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही वीज क्षेत्रातील दोन्ही प्रमुख कंपन्यांनी एकत्र येत सामाजिक बांधिलकी जपण्याच्या उद्देशाने या महोत्सवाचे आयोजन केले आहे.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते संजय आवटे हे आपल्या ओघवत्या शैलीत उपस्थितांना मार्गदर्शन करतील. मराठी वृत्तपत्रसृष्टीतील एक दिग्गज नाव असलेल्या आवटे हे 'व्हॉइस ऑफ मीडिया'चे राष्ट्रीय कार्याध्यक्ष आहेत. राजकीय



विश्लेषण, माध्यम नैतिकता आणि घटनात्मक मूल्ये यावर त्यांचे मोठे प्रभुत्व आहे. विशेषतः 'आम्ही भारताचे लोक' ही संविधानात्मक संकल्पना आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनकार्यावर ते अभ्यासपूर्ण भाष्य करणार असल्याने कर्मचाऱ्यांमध्ये कमालीची उत्सुकता आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्षपद महावितरण नागपूर परिमंडळाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके भूषविणार आहेत. तर प्रमुख पाहुणे म्हणून महापारेषणच्या नागपूर परिमंडळाचे मुख्य अभियंता सतिश अणे आणि म.रा.वि.मं. होल्डिंग कंपनीचे मुख्य अभियंता राकेश जनबंधू यांची विशेष उपस्थिती असेल.

'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती'ने या कार्यक्रमास महावितरण व महापारेषणमधील सर्व अधिकारी, अभियंता, कार्यालयीन कर्मचारी, सर्व वीज कामगार संघटनांचे पदाधिकारी, सभासद तसेच महिला प्रतिनिधींनी आपल्या सहपरिवारासह मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## खासदार संजय देशमुख यांचा अभिष्टचिंतन सोहळा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**मानोरा: तालुका प्रतिनिधी नितीन आढाव :** खासदार संजय देशमुख यांच्या वाढदिवस निमित्त दिग्रस येथील त्यांच्या बंगल्या वर अभिष्टचिंतन सोहळा पार पडला शेकडो कार्यकर्ते त्यांच्या परिचयचे मतदार संघातील प्रतिष्टीत व्यक्ती यांनी त्यांची भेट घेऊन शुभेच्छा दिल्या मतदार संघात प्रत्येक गोर गरीब जनतेचे काम करून देणारे खासदार यांची कामाची शैली प्रत्येक व्यक्ती ला माहिती च आहे त्यांनी अनेक कॅन्सर ग्रस्त रुग्णांना तातडीने प्रधानमंत्री सहायत निधी आणि



मुख्यामंत्री सहायता निधी मधून मदत मिळवून दिली कालच्या अभिष्टचिंतन सोहळ्या मध्ये त्यांनी कार्यकर्ते नागरिकांना आव्हान केले होते कि पुष्पगुछ शाल या वस्तू आणल्या पेक्षा वह्या पेन आना जेणे करून गरीब विद्यार्थ्यांना या वस्तू ची शैक्षणिक मदत होईल नंतर सगळ्यांनी जेवणाचा आस्वाद घेतला व सोहळा रात्री भेटीगाठी रात्री पर्यंत चालल्या.

## राज्यात आयपीएस अधिकाऱ्यांचा मोठा फेरबदल; अनेक जिल्ह्यांना नवे 'कॅप्टन', पोलिस प्रशासनात नवी ऊर्जा

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका** : राज्याच्या गृहविभागाने सोमवारी भारतीय पोलीस सेवेतील (IPS) वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मोठ्या प्रमाणावर बदल्यांचे आदेश जारी करत पोलिस प्रशासनात मोठी हालचाल घडवून आणली आहे. सातारा, सांगली, कोल्हापूर, जळगाव आणि वाशिम या महत्त्वाच्या जिल्ह्यांसह पुणे आणि मुंबईतील संवेदनशील पदांवर नव्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

या बदल्यांमुळे राज्यातील कायदा व सुव्यवस्था यंत्रणेला नवसंजीवनी मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. महाराष्ट्र पोलीस अधिनियमातील तरतुदीनुसार सक्षम प्राधिकरणाच्या मंजुरीने हे आदेश काढण्यात आले असून एकूण ९ वरिष्ठ अधिकाऱ्यांना नव्या जबाबदाऱ्या देण्यात आल्या आहेत.

**प्रमुख बदल्या आणि नियुक्त्या**

तुषार दोशी यांची साताऱ्यावरून सांगलीचे पोलीस अधीक्षक म्हणून बदली

निखिल पिंगळे यांची पुणे येथून साताऱ्याचे नवे पोलीस अधीक्षक म्हणून नियुक्ती

निलोत्पल यांची गडचिरोलीवरून कोल्हापूर येथे बदली

राजकुमार शिंदे यांची पुण्यावरून वाशिमचे पोलीस अधीक्षक म्हणून पदस्थापना

श्रीकांत ढिवरे यांची धुळेवरून जळगाव येथे नियुक्ती

एम. रमेश यांना गडचिरोली येथेच पोलीस अधीक्षक पदाचा वाढीव कार्यभार

योगेश गुप्ता यांची कोल्हापूरवरून गडचिरोली परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक म्हणून नियुक्ती

संदिप घुगे यांची सांगलीवरून मुंबई येथे राज्य गुप्तवार्ता विभागात पोलीस उपआयुक्त (सुरक्षा) म्हणून बदली

महेश्वर रेड्डी यांची जळगाववरून पुणे येथील राज्य गुन्हे अन्वेषण विभागात बदली

**प्रशासनात गती देण्याचा प्रयत्न**

राज्य सरकारच्या या निर्णयामागे पोलिस यंत्रणेची कार्यक्षमता वाढवणे, गुन्हेगारी नियंत्रण अधिक प्रभावी करणे आणि संवेदनशील जिल्ह्यांमध्ये अनुभवी नेतृत्व देणे हा उद्देश असल्याचे सूत्रांनी सांगितले. विशेषतः नक्षलग्रस्त गडचिरोलीसारख्या भागात करण्यात आलेल्या बदल्या महत्त्वाच्या मानल्या जात आहेत.

**अधिकृत आदेश जारी**

सदर बदली आदेश महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले असून, शासनाचे सहसचिव सुग्रिव धपाटे यांच्या स्वाक्षरीने हे आदेश निर्गमित झाले आहेत. संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ नवीन पदांवर रुजू होण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

**अपेक्षा काय?**

या फेरबदलामुळे जिल्हास्तरावर कायदा-सुव्यवस्था अधिक सक्षम होईल, गुन्हे उघडकीस आणण्याचे प्रमाण वाढेल आणि नागरिकांचा पोलिसांवरील विश्वास अधिक दृढ होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## अक्षय तृतीयेच्या शुभमुहूर्तावर महेंद्र निकम यांना "राष्ट्रीय कर्तव्यदक्ष ग्रामसेवक अधिकारी पुरस्कार

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी/ विजय काळे** : सोयगाव तालुक्यातील घोसला गावातील ग्रामपंचायत अधिकारी मेहेद्रं निकम यांना अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील Ralegan Siddhi येथे अक्षय तृतीयेच्या साडेतीन मुहूर्तापैकी एक शुभ मुहूर्त साधून १९ एप्रिल २०२६ रोजी भव्य सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.

आंतरराष्ट्रीय पर्यावरण बहुउद्देशीय संस्था व राष्ट्रीय पर्यटन विकास एवं सांस्कृतिक कला महोत्सव संस्था यांच्या



संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात ग्रामपंचायत अधिकारी महेंद्र सिताराम निकम यांना "राष्ट्रीय कर्तव्यदक्ष अधिकारी पुरस्कार – २०२६" देऊन गौरविण्यात आले.हा पुरस्कार ज्येष्ठ समाजसेवक व लोकपाल जनक Anna Hazare यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला.यावेळी अतिरिक्त जेल अधीक्षक डीसीपी/डीएसपी तिहाड जेल,दिल्ली येथील Ajay Bhatia,ह.भ.प. Balasaheb Maharaj Shewale, तसेच Deva Tambe (संस्थापक अध्यक्ष, आंतरराष्ट्रीय पर्यावरण मित्र बहुद्देशीय संस्था) यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे ठिकाण नवलभाऊ फिरोदिया (बाबा) सभागृह असे होते.या सन्मान सोहळ्यासाठी निकम यांच्या पत्नी सौ.जयश्री निकम देखील उपस्थित होत्या.महेंद्र निकम यांच्या कार्याचा गौरव म्हणून हा पुरस्कार देण्यात आल्याने ग्रामसेवक संघटनेचे अध्यक्ष राकडे नाना, सुनिल मगंळुले,व पंचक्रोशीतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.त्यांच्या कर्तव्यदक्ष कामगिरीबद्दल स्थानिक नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

## उरण तालुक्यात खत टंचाईचा प्रश्न उद्भवणार नाही

### उरण तालुक्यासाठी 425 मॅट्रिक टन युरिया रासायनिक खताचे नियोजन

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** तालुक्यातील शेतकऱ्यांना आगामी हंगामात रासायनिक खतांचा पुरेसा पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी कृषी विभागाने व्यापक नियोजन केले आहे. शासनाकडून उरण तालुक्यासाठी एकूण 425 मेट्रिक टन युरिया रासायनिक खताचे नियोजन करण्यात आले असून एप्रिल 2026 ते सप्टेंबर 2026 या कालावधीत नियोजित साठ्यानुसार खत विक्रेत्यांना टप्प्याटप्प्याने पुरवठा केला जाणार आहे. हंगामाच्या काळात खतांची टंचाई निर्माण होऊ नये यासाठी तालुक्यात 25 मेट्रिक टन युरिया खताचा संरक्षित साठा ठेवण्यात येणार असल्याची माहिती कृषी विभागाने दिली आहे. या नियोजनामुळे तालुक्यात आवश्यकतेनुसार अनुदानित खते उपलब्ध राहतील आणि शेतकऱ्यांना कोणतीही अडचण येणार नाही, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे. दरम्यान, रासायनिक खत नियंत्रण आदेश १९८५ तसेच अत्यावश्यक वस्तू अधिनियम 1995 अंतर्गत बाबींचे उल्लंघन केल्यास संबंधितावर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे.

तालुक्यासाठी उपलब्ध असलेले मंजूर वाटप आणि साठा लक्षात घेता खतांची टंचाई निर्माण होणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे. शेतकऱ्यांनी घाईघाईने खत खरेदी करू नये व खताची विक्री E -pos प्रणालीद्वारे होत असल्याने खते खरेदी करताना शेतकऱ्यांनी सोबत आधारकार्ड ठेवावे असे आवाहन करण्यात येत आहे.

तसेच चालू हंगामात खते व बियाण्यांचा पुरवठा सुरळीतपणे होण्याच्या दृष्टीने दक्षता घेण्याबाबत तालुक्यातील सर्व कृषी सेवा केंद्र धारकांना सूचना तालुका कृषी अधिकारी कार्यालयात तालुका कृषी अधिकारी,उरण व कृषी अधिकारी गुण नियंत्रण यांनी दिलेल्या आहेत व कुठेही खत विक्रीत 'लिंकिंग करून शेतकऱ्यांची अडवणूक होत असल्यास तात्काळ कृषी विभागाशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# शिवसेनेची सत्तेची ‘पॉवर ब्लूप्रिंट’ तयार; २२ जिल्ह्यांसाठी सर्वात मोठा गेम प्लॅन ॲक्टिव्ह!”

**•आगामी २२ जिल्हा परिषद व २२५ पंचायत समिती निवडणुकांसाठी १२ मंत्र्यांवर २२ जिल्ह्यांची जबाबदारी**
**•संघटन बूस्ट, निधी कंट्रोल आणि प्रशासनावर प्रभाव अशा तीन आघाड्यांवर जोरदार काम करण्याच्या सूचना**
**•शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नंदनवन निवासस्थानी बैठक संपन्न**

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी शिवसेनेने आता थेट रणशिंग फुंकले असून “संपर्क मंत्री अभियान” हे केवळ अभियान नसून सत्तेवर झेप घेण्याचा स्पष्ट आणि आक्रमक ब्लूप्रिंट ठरणार असल्याचे बोलले जाते. राज्यातील २२ जिल्ह्यांमध्ये संघटन झपाट्याने मजबूत करत जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांवर ताबा मिळवण्याचा निर्धार केला आहे. शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रत्येक संपर्क मंत्र्यांच्या खांद्यावर दोन जिल्ह्यांची जबाबदारी टाकत “जिंकाच, अन्यथा पर्याय नाही” असा स्पष्ट संदेश देण्यात आला आहे. उपमुख्यमंत्री यांच्या नंदनवन या निवासस्थानी एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवारी रात्री उशिरा प्रमुख मंत्र्यांची, पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली.

मागील स्थानिक स्वराज्य निवडणुकांमध्ये शिवसेनेने राज्यात क्रमांक दोनचा पक्ष म्हणून भक्कम स्थान मिळवले होते. या यशामुळे पक्षाच्या कामगिरीबाबत अपेक्षा मोठ्या प्रमाणात वाढल्या असून, त्याचबरोबर जबाबदारीही अधिक वाढली आहे. या पार्श्वभूमीवर आगामी निवडणुका केवळ पुनरावृत्तीची संधी नसून, आपले वर्चस्व अधिक मजबूत करण्याची आणि पहिल्या क्रमांकावर झेप घेण्याची निर्णायक लढाई म्हणून पाहिली जात आहे. त्यामुळेच पक्षाने यावेळी अधिक आक्रमक, नियोजनबद्ध आणि लक्ष्यकेंद्री रणनीती अवलंबत प्रत्येक स्तरावर विजय सुनिश्चित करण्याचा निर्धार केला आहे.

या अंतर्गत गुलाबराव पाटील यांच्याकडे जळगाव व नंदुरबार, उदय सामंत यांच्याकडे नाशिक व अहमदनगर, योगेश कदम यांच्याकडे ठाणे व पालघर, प्रकाश आबिटकर यांच्याकडे नांदेड व हिंगोली, भरतशेट गोगावले यांच्याकडे बीड, आशिष जयस्वाल यांच्याकडे जालना, प्रताप सरनाईक यांच्याकडे अमरावती व अकोला, संजय राठोड यांच्याकडे यवतमाळ व वाशिम, संजय शिरसाट यांच्याकडे भंडारा व गोंदिया, प्रतापराव जाधव यांच्याकडे नागपूर व वर्धा, शंभुराज देसाई यांच्याकडे गडचिरोली व चंद्रपूर तसेच दादा भुसे यांच्याकडे धुळे व बुलढाणा या जिल्ह्यांची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. या २२ जिल्ह्यांमध्ये जास्तीत जास्त जिल्हा परिषद गट आणि पंचायत समिती गण जिंकत जिल्हा परिषद अध्यक्ष आणि पंचायत समिती सभापती पदांवर भगवा फडकवणे हे अंतिम लक्ष्य निश्चित करण्यात आले आहे.

एकनाथ शिंदे यांनी संपर्क मंत्र्यांना दिलेले आदेशही तितकेच धारदार आहेत. प्रत्येक जिल्ह्यात टार्गेट फिक्स करून निवडणुकीची काटेकोर तयारी करायची, विजयाची टक्केवारी वाढवायची आणि जिंकण्याची क्षमता असलेले उमेदवार शोधून त्यांना पूर्ण ताकद द्यायची ही पहिली अट आहे. ज्या जिल्ह्यांमध्ये पालकमंत्री आहेत, त्या ठिकाणी जिल्हा व तालुका स्तरावरील शासकीय समित्यांमध्ये शिवसेनेचे प्रतिनिधित्व आक्रमकपणे वाढवायचे, यासाठी स्थानिक खासदार, आमदार आणि संपर्क प्रमुख यांच्याशी थेट समन्वय साधायचा असे स्पष्ट सांगण्यात आले आहे. इतकेच नव्हे, तर ज्या जिल्ह्यांमध्ये राष्ट्रवादी (अजित पवार गट) किंवा भाजपचे पालकमंत्री आहेत, तिथेही मागे हटायचे नाही शासकीय समित्यांमध्ये आपल्या पदाधिकाऱ्यांना स्थान मिळवून देण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

यासोबतच निधीची बाजूही तितकीच मजबूत ठेवण्यावर भर देण्यात आला आहे. जिल्हा नियोजन (DPDC) मधून जिल्हाप्रमुख, तालुकाप्रमुख आणि शाखाप्रमुख यांना निधी उपलब्ध करून देत स्थानिक पातळीवर पकड मजबूत करण्याचे निर्देश आहेत. प्रशासनावर प्रभाव निर्माण करत लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांना वेळोवेळी सहकार्य मिळेल याची खात्री करायची, तसेच शासकीय योजनांचा लाभ थेट तळागाळापर्यंत पोहोचवायचा ही जबाबदारीही स्पष्ट करण्यात आली आहे. विशेष कार्यकारी अधिकारी (S.E.O.) यांच्या नियुक्त्या करून संघटनात्मक यंत्रणा अधिक सक्षम करण्यावर भर देण्यात आला आहे. त्याचबरोबर बी एल ए यादी अद्ययावत ठेवणे आणि तालुका तसेच विधानसभा स्तरावर बी एल ए प्रशिक्षण शिबिरे आयोजित करून निवडणूक यंत्रणा पूर्णपणे सज्ज ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.एकूणच, शिवसेनेचे हे “संपर्क मंत्री अभियान” म्हणजे साधा कार्यक्रम नाही, तर स्थानिक सत्तेवर थेट कब्जा मिळवण्याची आक्रमक मोहीम आहे. संघटन, प्रशासन आणि निवडणूक व्यवस्थापन या तिन्ही आघाड्यांवर एकाच वेळी जोरदार हल्ला चढवत शिवसेना आता मैदानात उतरली असून, येणाऱ्या निवडणुकांमध्ये हा धडाका किती प्रभावी ठरतो याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

बैठकीला खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, आनंदराव अडसुळ (शिवसेना नेते), प्रकाश पाटील (शिवसेना नेते), भाऊसाहेब चौधरी (शिवसेना सचिव), मंत्री गुलाबराव पाटील, मंत्री दादा भुसे, मंत्री प्रकाश आबिटकर, मंत्री प्रताप सरनाईक, मंत्री आशिष जैस्वाल, आमदार डॉ. मनिषा कायंदे तसेच माजी आमदार रविंद्र फाटक उपस्थित होते. बैठकीला ऑनलाईन उपस्थिती म्हणून मंत्री उदय सामंत, मंत्री शंभूराज देसाई, मंत्री संजय राठोड, मंत्री भरतशेठ गोगावले, मंत्री योगेश कदम, मंत्री संजय शिरसाठ आणि केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव सचिव संजय मोरे सहभागी झाले होते.

# अंजनगावसुर्जी गॅस संकट भडकले! सिलिंडर तुटवड्यामुळे संतप्त नागरिकांचा गोंधळ

## खासदार बळवंत वानखडे यांची तातडीची धाव

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका :** शहरातील घरगुती गॅस सिलिंडरच्या तीव्र तुटवड्यामुळे आज अंजनगावसुर्जीमध्ये नागरिकांचा संताप उसळला. गेल्या काही दिवसांपासून गॅस एजन्सीकडे सिलिंडर उपलब्ध नसल्याने त्रस्त झालेल्या शेकडो ग्राहकांनी आज एजन्सीसमोर मोठी गर्दी करून तीव्र निषेध व्यक्त केला. परिस्थिती इतकी चिघळली की काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.

सिलिंडरच्या कमतरतेमुळे नागरिकांना वारंवार एजन्सीकडे फेऱ्या माराव्या लागत होत्या. अनेकांनी तासन् तास रांगेत उभे राहूनही रिकाम्या हाताने परतावे लागत असल्याची खंत व्यक्त केली. “बुकिंग करूनही गॅस मिळत नाही, मग आम्ही करायचं काय?” असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला.

नागरिकांचा आक्रोश उफाळला

सकाळपासूनच एजन्सीसमोर लांबच लांब रांगा लागल्या होत्या. महिलांसह ज्येष्ठ नागरिकांना विशेष त्रास सहन करावा लागला. काहींनी घरगुती कामे अडकल्याची व्यथा मांडली, तर काहींनी वारंवारच्या विलंबामुळे आर्थिक व मानसिक तणाव वाढल्याचे सांगितले. अखेर संयम सुटल्याने ग्राहकांनी एजन्सी प्रशासनाला जाब विचारत गोंधळ घातला.



खासदार बळवंत वानखडे यांचा हस्तक्षेप

परिस्थिती गंभीर होत असल्याची माहिती मिळताच खासदार बळवंत वानखडे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी प्रत्यक्ष रांगेत उभ्या असलेल्या महिला व नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या समस्या ऐकून घेतल्या.

ग्राहकांचा रोष रास्त असल्याचे लक्षात येताच त्यांनी तिथूनच जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून संपर्क साधून कठोर शब्दांत नाराजी व्यक्त केली.

“सामान्य नागरिकांना मूलभूत गरजेसाठी तासन् तास रांगेत उभे राहावे लागत असेल, तर हे प्रशासनाचे अपयश आहे. तातडीने गॅसपुरवठा सुरळीत करा,” असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला.

प्रशासनाचे आश्वासन, पण नागरिक साशंक

खासदारांच्या हस्तक्षेपानंतर प्रशासनाने तातडीने अतिरिक्त गॅस सिलिंडरची खेप उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. प्रलंबित बुकिंग असलेल्या ग्राहकांना प्राधान्याने व पारदर्शक पद्धतीने वितरण करण्याचे निर्देशही देण्यात आले.

या आश्वासनानंतर काही प्रमाणात परिस्थिती निवळली असली तरी, समस्या कायमस्वरूपी सुटेल का याबाबत नागरिकांमध्ये अजूनही साशंकता आहे.

स्थानिक नेत्यांची उपस्थिती

या प्रसंगी बाजार समितीचे सभापती सुनील गावंडे, काँग्रेसचे शहराध्यक्ष प्रदीप देशमुख, संचालक विकास येवले, नगरसेवक सुयोग खाडे, कैलास सिरसाट यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

**निष्कर्ष:**

अंजनगावसुर्जीतील गॅस तुटवडा ही केवळ तात्पुरती अडचण नसून पुरवठा व्यवस्थेतील गंभीर त्रुटी असल्याचे या घटनेतून स्पष्ट झाले आहे. तातडीच्या उपाय योजनांसोबतच दीर्घकालीन नियोजनाची गरज आता अधिक तीव्रतेने जाणवू लागली आहे.

# जिद्द मेहनतीच्या बळावर ओमकार स्वामीचे एमबीबीएस डॉक्टर होण्याचे स्वप्न केले साकार

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी अशोक नवघरे** : पाथरी/ पाथरी तालुक्यातील मुदगल येथील उमाशंकर स्वामी यांचा मुलगा ओमकार पण घरची परिस्थिती मर्यादित पण स्वप्न आभाळाएवढे मोठे वडील जिल्हा परिषद शाळेत शिक्षक म्हणून कार्यरत होते तर मुलांने शिक्षणाच्या बळावर आयुष्य बदलण्याचा निर्धार केलेला ही कहाणी आहे डॉ ओमकार स्वामी यांची ज्यांनी आपल्या जिद्दी चिकाटी आणि आथक परिश्रमाच्या जोरावर एमबीबीएस डॉक्टर होण्याचे स्वप्न साकार केले डॉ ओमकार स्वामी यांचे वडील उमाशंकर स्वामी हे आज पर्यंत ग्रामीण भागात शिक्षक म्हणून कार्यरत होते आणि वडील अपंग असल्याने ते मुदगल या आपल्या राहचे त्यांनी जास्त काळ वाघाळा येथे जिल्हा परिषद शाळेत शिक्षक म्हणून नोकरी केली मुलगा ओमकार हा बाहेर गावी शिक्षण घेत तर वडील उमाशंकर स्वामी यांनी दिनचर्येतून त्यांनी आपल्या मुलाला शिक्षणाची प्रेरणा दिली आर्थिक अडचणी मर्यादित साधने या सगळयांवर मात करत डॉ ओमकार यांनी अभ्यासाची कास कधीच सोडली नाही मिरज येथे एमबीबीएसचे शिक्षण पूर्ण करताना त्यांना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागले मात्र प्रत्येक अडचणीतून मार्ग तर इंटर्नशिपही यशस्वीरीत्या पूर्ण केली त्यांच्या या यशामागे आई वडिलांचे मार्गदर्शन कुटुंबचा भक्कम पाठिंबा आणि स्वतः ची अथक मेहनत हेच



खरे आधारस्तंभ ठरले आज त्यांच्या या यशामुळे संपूर्ण आनंदाचे वातावरण आहे सामाजिक शैक्षणिक आणि विविध क्षेत्रांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे सामान्य कुटुंबातून आलेल्या मुलाने डॉक्टर होऊन एक युवकांसमोर एक आदर्श निर्माण केला डॉक्टर ओमकार स्वामी यांची ही यशोगाथा प्रत्येक तरूणांसाठी प्रेरणादायी आहे डॉक्टर ओमकार यांच्या वडिलांनी आपली प्रतिक्रिया दैनिक युवक आधारला देतानी सांगितले की मुलगा ओमकार डॉक्टर झाला हे आमच्यासाठी खूप मोठे स्वप्न पूर्ण झाल्यासारखे आहे आम्ही साध्या परिस्थितीत राहुनही त्याला शिकवण्यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न केले ओमकार ही खुप कष्ट घेतले अनेक अडचणीना सामोरे गेला पण कधी हार मानली नाही आज त्यांचे यश पाहून सगळया कष्टांचे चीज झाले असे वाटते त्यांने पूढे जाऊन समाजाची सेवा करावी हीच आमची अपेक्षा आहे

# रेल्वे कर्मचारी जयंती समिती, वरूड ऑरेंज सिटी, वरूड, अमरावती ,येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी

**दैनिक युवक आधार**

**डॉ सुनिल भगत प्रतिनिधी नागपूर :** जयंती उत्सव समिती* व *रमाई महिला* मंडळ द्वारे , महात्मा फुले व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती निमित्त कार्यक्रम २० एप्रिल २०२६ ला आयोजित करण्यात आला.

संविधान प्रास्ताविकेचे वाचन* सामूहिक रित्या,शोभा पाटील,प्रीती पटले,शीतल मोहिते, निशाकुमारी यादव, खुशबू कुमारी ह्यांनी केले.

विजयाताई श्रीखंडे, शीलाताई डोंगरे ह्यांनी चळवळी चे गीत *माझ्या भारत देशात* प्रस्तुत केले .

त्यागमूर्ती रमाई भीमराव आंबेडकर* ही रमाई च्या जीवना वरील **लघु नाटिका**

रमाई च्या रूपात शोभा गौतम पाटील* यांनी व सोबत बाबासाहेब च्या रुपात *गौतम पाटील* ह्यांनी, भूमिका सादर केली. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे *राज्य कार्य





कारणी सदस्य ,रामभाऊ डोंगरे* यांनी महा.अनिसचे भूमिका व बुवाबाबा लोंकांना चमत्कार करून कसे लुबाडतात त्याचे सादरीकरण केले. प्रा. कमलनारायण उइके ह्यांनी संविधान विषयावर भाषण केले.

अनुप कुमार श्रीवास्तव ह्यांनी विवेकी वाटचाल वर प्रबोधन केले. बाबासाहेबांचे मानवता वादी विचा ह्यावर मा. *सुदेश महेंगिया* तर *मा.अमित*नगराळे* ह्यांनी बाबासाहेबा नी केलेले मानवतावादी परिवर्तन ह्या विषयावर प्रबोधन केले.

उत्कृष्ट सूत्र संचालन *मुकेश* *पटले* ह्यांनी केले.MPSC परीक्षेत वरूड येथील कर्मचारी आयु. चंद्रदीप सोनटक्के उत्तीर्ण झाल्याबद्दल व, त्याला सहाय्यक विक्री कर विभाग मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

उरलेल्या वर्गणीतून मिलिंद स्टडी सर्कल, नागसेन लायब्ररी, वरूड लां MPSC EXAM साठी दहा पुस्तके वाटप करण्यात आली.वरूड रेल्वे कॉलोनी परिसर मधील ज्येष्ठ सभासद आयु . रविकांत मोहिते, मुकेश पटले, चंद्रकांत धाकडे ,धीरज कावळे, सुखदेव भलावी ,जितेंद्र कुमार, राकेश रंजन, अनुप कुमार श्रीवास्तव ,सुदेश कुमार मंहेग्या, अमित कुमार नगराळे ,प्रफुल्ल चौधरी ,सतीश पोहणे ,बाबाराव इंगळे, स्नेहल मेश्राम ,सिकंदर यादव ,सिताराम मीना ,जितेंद्र कुमार ,अजित कुमार, चैनसुख मिना,विनोदकुमार मीना ,अक्षय जयस्वाल, अखिलेश केवट , भावेश शाहू ,अंकित पवार, मनोज शंकर ,नीरज कुमार, गुंजन कुमार, कमलेश चौधरी, देवानंद सहारे ,मुकुंद नागवंशी, विलास गावंडे, हिमांशू कौशल, संतोष कुमार सिंग ,सौरभ कुमार, रौनक सिंग ,लक्ष पाटेकर, अस्मित कावळे ह्यांनी कार्यक्रम उत्साहाने आयोजित करण्या साठी, उत्सव समिती तर्फे परिश्रम घेतले.कार्यक्रमात अन्य मान्यवर कर्मचारी, प्रेक्षक,शंभराच्या संख्येने सदस्य वर उपस्थित होते.

# नागपूर मेडिकल कॉलेजमध्ये ‘स्मार्ट कंपनी’चा मनमानी कारभार?

## स्थानिक बेरोजगारांना डावलून लाखोंची वसुलीचा आरोप!

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू/ संपादक नागपूर विभाग** : नागपूर येथील Government Medical College and Hospital Nagpur मध्ये कंत्राटी भरती प्रक्रियेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, ‘स्मार्ट कंपनी’च्या कथित मनमानी आणि भ्रष्ट कारभाराविरोधात संतापाची लाट उसळत आहे. स्थानिक तरुणांना डावलून बाहेरील उमेदवारांना प्राधान्य देणे, तसेच लाखो रुपयांची वसुली केल्याचे धक्कादायक आरोप समोर आले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, सदर कंपनीकडून मेडिकल कॉलेजमध्ये कंत्राटी क्लर्क पुरविण्याचे काम केले जाते. मात्र, भरती प्रक्रियेत पारदर्शकतेचा पूर्णतः अभाव असल्याचा आरोप होत आहे. विशेष म्हणजे, 20 जानेवारी 2026 रोजी निवड प्रक्रिया पार पडली आणि अनेक उमेदवारांना कागदपत्र



पडताळणीसाठी बोलावण्यात आले. परंतु, त्यानंतर एकाही स्थानिक उमेदवाराला संधी न देता बाहेरून आलेली यादी अंतिम करण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

याबाबत कॉलेज प्रशासनालाही अवगत करून देण्यात आले असून, डीन Dr. Gajbhiyye यांना लेखी तक्रार देण्यात आली आहे. तरीदेखील संबंधित कंपनीच्या कारभारावर कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याने संतप्त उमेदवारांनी प्रश्न उपस्थित केले आहेत.

दरम्यान, मेडिकल कॉलेजमध्ये रुजू होण्यासाठी आलेल्या दोन महिला उमेदवारांनी प्रत्येकी सुमारे तीन लाख रुपये दिल्याचा गंभीर आरोप केला आहे. यामुळे संपूर्ण भरती प्रक्रियेवरच संशयाचे सावट निर्माण झाले आहे.

नागपूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर बेरोजगारी असताना स्थानिकांना प्राधान्य न देता बाहेरील उमेदवारांची निवड केली जात असल्याने तरुणांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे, याच ठिकाणी काम करणाऱ्या ‘क्रिस्टल’ कंपनीचे काम समाधानकारक असल्याचे सांगितले जात असताना ‘स्मार्ट कंपनी’च्या कारभारावर मात्र सातत्याने प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत.

सरकारी नियमांनुसार (GR) भरती प्रक्रियेत अंतिम अधिकार डीन यांच्याकडे असतानाही, त्या नियमांचे उल्लंघन करून कंपनी मनमानी करत असल्याचा आरोप होत आहे.

**कडक कारवाईची मागणी**

या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करावी, तसेच संबंधित ‘स्मार्ट कंपनी’ला काळ्या यादीत टाकावे, अशी जोरदार मागणी स्थानिकांकडून केली जात आहे. नागपूरमधील बेरोजगार तरुणांना न्याय मिळावा, यासाठी प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करण्याची गरज व्यक्त होत आहे.

# पत्रकारांना २० लाखांचा विमा आणि विशेष प्रशिक्षण देणार

## जेएमए-राष्ट्रीय अध्यक्ष वैशाख सुरेश यांनी केली घोषणा




**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : पत्रकार आणि माध्यम संघटनेने महाराष्ट्र राज्यात कार्यरत असलेल्या पत्रकारांना २० लाखांचा विमा आणि विशेष प्रशिक्षण देण्याची घोषणा केली आहे. भारत सरकारच्या माहिती आणि प्रसारण मंत्रालयाअंतर्गत चालणाऱ्या पत्रकार माध्यम संघटनेच्या तक्रार निवारण परिषदेचे अध्यक्ष वैशाख सुरेश यांनी नवी मुंबई वाशी येथील मिनी पंजाब बँक्वेट हॉलमध्ये आयोजित या स्वागत समारंभ कार्यक्रमादरम्यान ही घोषणा केली. जेएमएचे राष्ट्रीय सरचिटणीस अरुमुखम पिल्लई, राज्य प्रभारी सुधीर शर्मा, नवनिर्वाचित महाराष्ट्र अध्यक्ष संजय निराळे, सरचिटणीस संजय पवार, वरिष्ठ उपाध्यक्ष दत्तात्रय सूर्यवंशी, राज्य सल्लागार राजीव मोहन मिश्रा आणि सुचिता बिराजदार, उपाध्यक्ष कमर शाह, लालचंद यादव यांच्यासह मोठ्या संख्येने जेएमएचे सदस्य उपस्थित होते. विशेष अतिथी म्हणून बोलताना, उपमहापौर दशरथ भगत यांनी प्रसारमाध्यमांच्या आव्हानात्मक परिस्थितीचा उल्लेख केला आणि पत्रकार माध्यम संघटनेची सकारात्मक मोहीम यशस्वी करण्यासाठी सर्वतोपरी मदतीचे आश्वासन दिले. राष्ट्रीय अध्यक्ष वैशाख सुरेश आणि सरचिटणीस अरुमुखम पिल्लई यांनी महाराष्ट्रात जेएमएची स्थापना आणि विस्तारासाठी कार्यरत असलेल्या राज्य प्रभारी सुधीर शर्मा यांच्या सकारात्मक प्रयत्नांना प्रोत्साहन दिले. छापील आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये डिजिटल पत्रकारिता अधिक व्यापक आणि प्रभावी होत आहे, परंतु ऑनलाइन माध्यमांना छापील आणि टीव्ही माध्यमांइतका पाठिंबा मिळत नाही. राष्ट्रीय अध्यक्षांनी सांगितले की, जेएमए एक सहकारी संस्था सुरू करत आहे, ज्याद्वारे पत्रकारांना कोणत्याही त्रासाशिवाय कर्ज आणि आर्थिक मदत मिळू शकेल. त्याचबरोबर, संस्थेशी संबंधित माध्यम कर्मचाऱ्यांना किमान प्रीमियमवर २० लाखांपर्यंतचा अपघाती विमा मिळेल आणि दर तीन महिन्यांनी पत्रकारिता व सुरक्षेचे विशेष प्रशिक्षण दिले जाईल. राष्ट्रीय अध्यक्ष वैशाख सुरेश यांनी सांगितले की, पत्रकार माध्यम संघटना देशातील विविध राज्यांमधील ऑनलाइन पत्रकारांना ओळख, सुरक्षा आणि सुविधा देण्यासाठी भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयासोबत सातत्याने काम करत आहे. त्यांनी केवळ यूट्यूबवर बातम्या देणाऱ्यांना सावध केले आणि सांगितले की ही कायदेशीर पत्रकारिता नाही, त्यामुळे डोमेन घेणे आवश्यक आहे, तरच त्यांना डिजिटल पत्रकार म्हणून गणले जाईल. त्यांनी सांगितले की, जेएमएजीसी मार्फत अशा ऑनलाइन माध्यमांना मान्यता देण्याची प्रक्रिया सुरू आहे. त्यांनी असंघटित माध्यमांना जेएमएमध्ये सामील होण्याचे आवाहन केले आणि महाराष्ट्र युनिटला सर्वतोपरी मदतीचे आश्वासन दिले.

जर्नलिस्ट मीडिया असोसिएशनचे महाराष्ट्र अध्यक्ष संजय निराळे यांनी आश्वासन दिले की, ते सरचिटणीस संजय पवार आणि कार्यकारी अध्यक्ष विनायक गुलगुले यांच्यासह महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात जेएमए पर्यंत पोहोचतील. त्याचवेळी, राज्य प्रभारी सुधीर शर्मा यांनी विश्वास व्यक्त केला की, राष्ट्रीय अधिकाऱ्यांशी थेट संवादाचा हा कार्यक्रम डिजिटल पत्रकारितेची सद्यस्थिती आणि त्यापुढील आव्हाने समजून घेण्यासोबतच काहीतरी नवीन शिकण्यासाठी उपयुक्त ठरेल. जेएमएची डिजिटल आणि ऑनलाइन पत्रकारांसाठीची आर्थिक सहाय्य योजना उपेक्षित आणि पीडित पत्रकारांना सक्षम करण्यास मदत करेल. सुधीर शर्मा यांनी ऑनलाइन-डिजिटल माध्यम कार्यकर्त्यांना जेएमएमध्ये सामील होऊन एकत्र पुढे जाण्याचे आवाहन केले.

## श्रीवर्धन तहसील कार्यालयातील संपामुळे नागरिक व विद्यार्थ्यांचे हाल; जबाबदार कोण?

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी - अनिकेत मोहित** : श्रीवर्धन तालुक्यातील तहसीलदार कार्यालयात सुरू असलेल्या संपाचा फटका सर्वसामान्य नागरिकांसह विद्यार्थ्यांना बसत असून, खेडोपाड्यातून येणाऱ्या लोकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. विविध शासकीय कामांसाठी तहसील कार्यालयावर अवलंबून असलेल्या नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे.

विशेषतः शालेय व महाविद्यालयीन प्रवेशासाठी आवश्यक असलेले उत्पन्न दाखले, जातीचे दाखले तसेच इतर कागदपत्रे मिळवण्यासाठी अनेक विद्यार्थी दररोज तहसील कार्यालयात येत आहेत. मात्र संपामुळे ही कामे ठप्प झाल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

याशिवाय, खेड्यापाड्यातील जेष्ठ नागरिक व सर्वसामान्य नागरिक विविध कामांसाठी तहसील कार्यालयात येतात. परंतु संपामुळे त्यांना वारंवार फेऱ्या माराव्या लागत असून, वेळ आणि पैशाचा अपव्यय होत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

या संदर्भात तहसीलदार यांच्याकडे विचारणा केली असता, "ही बाब शासकीय स्तरावरील असून संबंधित संघटनेचा विषय आहे. संप कधी संपेल याबाबत निश्चित सांगता येत नाही," असे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, स्थानिक नागरिकांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करत, "विद्यार्थ्यांचे नुकसान झाले तर याला जबाबदार कोण?" असा सवाल उपस्थित केला आहे. प्रशासनाने तातडीने लक्ष घालून हा प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणीही जोर धरत आहे.

## माजी समाज कल्याण मंत्री तथा विद्यमान आ. राजकुमार बडोले यांची पत्रकार तथा समाजसेवक संजीव भांबोरे यांनी घेतली त्यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट



**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे** : आज दिनांक 21 एप्रिल 2026 ला सकाळी 10.30 वाजता प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे राज्य सरचिटणीस तथा समाजसेवक संजीव भांबोरे यांनी सडक अर्जुनी येथील त्यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट घेऊन त्यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांच्या सत्कार केला. यावेळी त्यांच्यासोबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्राप्त तथा एशियन व भिमपर्व न्यूज चैनल चे मुख्य संपादक पत्रकार डी जी रंगारी उपस्थित होते. यावेळी पत्रकार डी. जी .रंगारी व पत्रकार संजीव भांबोरे यांनी आमदार राजकुमार बडोले यांच्यासोबत सामाजिक चळवळी विषयी विस्तृत चर्चा केली.

## सणसर भवानीनगर अवैध धंद्यांचा सुळसुळाट; प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे नागरिक व महिला त्रस्त




**दैनिक युवक आधार**

**सणसर :- विकास क्षत्रिय** : इंदापूर तालुक्यातील सणसर भवानीनगर या गावामध्ये दारू,मटका,जुगार या अवैध धंद्यांचा सुळसुळाट झाला आहे. या ठिकाणी तळीरामांमुळे महिला, विद्यार्थी व ग्रामस्थांना नाहक त्रास सहन करावा लागत असून नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.सणसर ग्रामपंचायतीने काही वर्षांपूर्वी ग्रामसभेत दारूबंदीचा ठराव केला होता. मात्र तो ठराव फक्त कागदावरच राहिला असून त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी अद्याप झालेली नाही.यामुळे ग्रामपंचायतीच्या निष्क्रियतेवर सुद्धा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

दारू जुगार व मटका विक्रीच्या ठिकाणी वारंवार वादाचे प्रकार घडतात. महिलांनी सांगितले की या अवैध धंद्यांमुळे अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत. गावाच्या जवळच असलेल्या शाळेत येणाऱ्या-जाणाऱ्या विद्यार्थ्यांना व पालकांना या ठिकाणी होणाऱ्या वादांमुळे त्रास सहन करावा लागतो.वालचंदनगर पोलिस प्रशासनाकडून या अवैध धंद्यांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. गावाच्या अगदी जवळच आणि मध्यभागी बाजारपेठेत हे धंदे सुरू असल्यामुळे वारंवार वादाचे प्रकार घडतात नागरिकांनी पोलिस प्रशासन व ग्रामपंचायतीने तातडीने व कडक कारवाई करून या अवैध धंद्यांचा कायमस्वरूपी बंदोबस्त करावा,अशी मागणी केली आहे.ग्रामस्थांनी स्पष्ट इशारा दिला आहे की जर प्रशासनाने तातडीने कारवाई केली नाही तर ग्रामस्थ एकत्र येऊन आंदोलनाचा मार्ग अवलंबतील गावातील शांतता,विद्यार्थ्यांचे भविष्य आणि महिलांचे सुरक्षित जीवन यासाठी प्रशासनाने तातडीने पावले उचलणे अत्यावश्यक आहे.

## देशी दारू प्रकरणी गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** देशी दारू विक्री प्रकरणी खारघर पोलिसांनी एकावर गुन्हा दाखल केला. पदु आल्या घरत (वय 71 राहणार मुरबी गाव) यांच्याकडे देशी दारूचा माल विनापरवाना विक्री करण्यासाठी सापडून आला.

## सोन्याची चैन खेचून नेल्या प्रकरणी गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : 49 वर्षीय इसमाच्या गळ्यातील सोन्याची चैन खेचून नेल्याप्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात 20 जुलै रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. राहुल मधुकर सोनटक्के हे कामोठे, सेक्टर सहा ए येथे राहत असून ते रामशेठ ठाकूर शाळेच्या पुढे कामोठे येथे आले असता दुचाकीवरून आलेल्या दोन अज्ञात इसमांनी त्यांच्या गळ्यातील पंधरा ग्राम वजनाची सोन्याची चैन त्यामध्ये तीन ग्राम वजनाचे सोन्याचे गणपतीचे पेंडल जबरदस्तीने चोरी करून पळून गेले. या प्रकरणी कामोठे पोलीस अधिक तपास करत आहेत.

## सभापती हर्षवर्धनजी लोंढे यांची भेट : अंथुर्णे शाळेचा प्रवेशोत्सव उत्साहात



**दैनिक युवक आधार**

**सणसर :- विकास क्षत्रिय** : अंथुर्णे (ता.इंदापूर) जिल्हा परिषद शाळा अंथुर्णे येथे इयत्ता पहिली प्रवेशोत्सव व इयत्ता चौथी निरोप समारंभ अत्यंत उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात पार पडला.यावेळी इंदापूर पंचायत समितीचे सभापती हर्षवर्धनजी लोंढे साहेब यांनी कार्यक्रमास भेट देऊन विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या व त्यांचा उत्साह द्विगुणित केला.नव्याने दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांची भव्य मिरवणूक ट्रॅक्टरमधून गावातून काढण्यात आली.फुलांच्या पायघड्यां वरून विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देण्यात आला कृतीयुक्त गीतांवर आधारित मनोरंजनात्मक कार्यक्रम सादर करण्यात आला. सेवानिवृत्त शिक्षक सहदेव शेंगळे सर यांनी गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले.वर्गशिक्षिका जुबेदा मॅडम यांनी मिरवणुकीसाठी स्वतःचा ट्रॅक्टर उपलब्ध करून देण्यात आला किशोर वाघ सर यांनी विद्यार्थ्यांना जीवनात योग्य दिशा निवडण्याचे महत्त्व सांगितले.विद्यार्थ्यांनी मनोगतातून आई-वडील, शिक्षक व शाळेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

प्राथमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष नानासाहेब नरुटे पाटील यांनी उज्ज्वल भविष्यासाठी प्रेरणा दिली.विस्तार अधिकारी मनोहर सांगळे साहेब यांनी जिल्हा परिषद शाळा ही गुणवत्तापूर्ण शिक्षणाची योग्य निवड असल्याचे अधोरेखित केले.प्रभात फेरीदरम्यान सभापती हर्षवर्धनजी लोंढे, विस्ताराधिकारी सुनील मुगळे व केंद्रप्रमुख चुडामन धापटे उपस्थित होते.पालकांमध्ये जिल्हा परिषद शाळांबद्दल सकारात्मक संदेश पोहोचला.शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा काजल साबळे, उपाध्यक्ष संदीप साबळे, अभिजीत साबळे,माजी अध्यक्ष वैभव साबळे यांचे विशेष योगदान लाभले. सदस्य छगन साबळे, विनोद गायकवाड, बापू गायकवाड,गंगाराम बनकर,राजू शेख यांचे सहकार्य शिक्षक वर्ग गणेश धायगुडे सर, दत्तात्रय गोसावी सर,मंदाकिनी शिंदे मॅडम,सुलेखा जाधव मॅडम,वृषाली मोरे मॅडम यांचे आणि महिला पालक प्रमिला भरणे व इतर महिला वर्ग यांचे सहकार्य लाभले केंद्रातील शिक्षक वर्ग,तरुण नेते अमोलजी लोंढे,अशोक वाघ,राजेंद्र पवार सर,पैगंबर शेख व इतर शिक्षक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित.

## निफाडमध्ये निवासी अतिक्रमणे नियमित करण्यासाठी विशेष मोहीम; ८ मेपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन



**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी/ राहुल कुलकर्णी** : महसूल व वन विभागाच्या २५ मार्च २०२६ च्या शासन निर्णयानुसार शासकीय जमिनीवरील निवासी अतिक्रमणे नियमानुकूल करण्यासाठी निफाड तालुक्यात विशेष मोहीम सुरू करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर प्रांताधिकारी डॉ. शशिकांत मंगरुळे यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी (दि. २२) ऑनलाईन आढावा बैठक पार पडली.

या बैठकीस तहसिलदार विशाल नाईकवाडे, गटविकास अधिकारी नम्रता जगताप, मुख्याधिकारी किरण देशमुख, श्रिया देवचक्के, धिरज भामरे तसेच उपअधीक्षक भूमी अभिलेख राजेंद्र भाबड उपस्थित होते. बैठकीत संबंधित अधिकाऱ्यांना शासन निर्णयाची सविस्तर माहिती देण्यात आली असून, अंमलबजावणीबाबत आवश्यक सूचनाही देण्यात आल्या.

शासनाच्या निकषांनुसार १ जानेवारी २०११ पूर्वी अस्तित्वात असलेली आणि सध्या वापरात असलेली निवासी अतिक्रमणेच नियमित केली जाणार आहेत. संबंधित जागा केवळ स्व-राहण्यासाठी वापरलेली असणे आवश्यक आहे. ५०० चौ. फुटांपर्यंतची अतिक्रमणे विनामूल्य नियमित केली जाणार असून, ५०० ते १५०० चौ. फुटांपर्यंतच्या क्षेत्रासाठी अतिरिक्त भागावर बाजारमूल्याच्या १० टक्के शुल्क आकारले जाणार आहे. मात्र, १५०० चौ. फुटांपेक्षा अधिक अतिक्रमण नियमित करण्यात येणार नाही.

पात्र लाभार्थ्यांनी ८ मे २०२६ पर्यंत अर्ज सादर करणे बंधनकारक आहे. ग्रामीण भागातील नागरिकांनी ग्रामसेवकांकडे, तर नगर परिषद व नगर पंचायत क्षेत्रातील नागरिकांनी संबंधित मुख्याधिकाऱ्यांकडे अर्ज करावेत. अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे तसेच कुटुंबाच्या नावावर संपूर्ण महाराष्ट्रात एकच अतिक्रमण असल्याचे शपथपत्र जोडणे आवश्यक आहे.

नियमित केलेली जमीन पती-पत्नीच्या संयुक्त नावाने 'भोगवटादार वर्ग-२' म्हणून दिली जाणार असून, ती पुढील पाच वर्षे विक्री किंवा हस्तांतरण करता येणार नाही. गायरान, नदी-नाले, सार्वजनिक रस्ते, स्मशानभूमी, वन जमीन तसेच धोकादायक क्षेत्रांवरील अतिक्रमणे या योजनेत समाविष्ट नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

दरम्यान, पात्र नागरिकांनी ही संधी दवडू नये आणि विहित मुदतीत अर्ज सादर करून योजनेचा लाभ घ्यावा, अन्यथा अनधिकृत अतिक्रमणांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## उरण तालुक्यात खत टंचाईचा प्रश्न उद्भवणार नाही ;उरण तालुक्यासाठी 425 मॅट्रिक टन युरिया रासायनिक खताचे नियोजन

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** तालुक्यातील शेतकऱ्यांना आगामी हंगामात रासायनिक खतांचा पुरेसा पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी कृषी विभागाने व्यापक नियोजन केले आहे. शासनाकडून उरण तालुक्यासाठी एकूण 425 मेट्रिक टन युरिया रासायनिक खताचे नियोजन करण्यात आले असून एप्रिल 2026 ते सप्टेंबर 2026 या कालावधीत नियोजित साठ्यानुसार खत विक्रेत्यांना टप्प्याटप्प्याने पुरवठा केला जाणार आहे.हंगामाच्या काळात खतांची टंचाई निर्माण होऊ नये यासाठी तालुक्यात 25 मेट्रिक टन युरिया खताचा संरक्षित साठा ठेवण्यात येणार असल्याची माहिती कृषी विभागाने दिली आहे. या नियोजनामुळे तालुक्यात आवश्यकतेनुसार अनुदानित खते उपलब्ध राहतील आणि शेतकऱ्यांना कोणतीही अडचण येणार नाही, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे. दरम्यान, रासायनिक खत नियंत्रण आदेश १९८५ तसेच अत्यावश्यक वस्तू अधिनियम 1995 अंतर्गत बाबींचे उल्लंघन केल्यास संबंधितावर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे तालुक्यासाठी उपलब्ध असलेले मंजूर वाटप आणि साठा लक्षात घेता खतांची टंचाई निर्माण होणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे. शेतकऱ्यांनी घाईघाईने खत खरेदी करू नये व खताची विक्री E -pos प्रणालीद्वारे होत असल्याने खते खरेदी करताना शेतकऱ्यांनी सोबत आधारकार्ड ठेवावे असे आवाहन करण्यात येत आहे. तसेच चालू हंगामात खते व बियाण्यांचा पुरवठा सुरळीतपणे होण्याच्या दृष्टीने दक्षता घेण्याबाबत तालुक्यातील सर्व कृषी सेवा केंद्र धारकांना सूचना तालुका कृषी अधिकारी कार्यालयात तालुका कृषी अधिकारी,उरण व कृषी अधिकारी गुण नियंत्रण यांनी दिलेल्या आहेत व कुठेही खत विक्रीत 'लिंकिंग करून शेतकऱ्यांची अडवणूक होत असल्यास तात्काळ कृषी विभागाशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# महिला आरक्षणावर बोलण्याचा भाजपाला अधिकार नाही, आधी ‘बंच ऑफ थॉट’ व ‘मनुस्मृती’ जाळा मग बोला

## हिम्मत असेल तर RRS च्या सरसंघचालकपदी महिला नियुक्त करा : हर्षवर्धन सपकाळ

•भाजपा डिलीमिटेशनवर का बोलत नाही? मुंबई व महाराष्ट्राचा गायपट्टा करण्याचा भाजपा व देवेंद्र फडणवीसांचा डाव
•वरळीतील मोर्चावर संताप व्यक्त करणाऱ्या महिलेचा VDO चित्रित करणाऱ्या पत्रकारांना भाजपाकडून धमक्या देण्याचा प्रकार म्हणजे ‘उलटा चोर कोतवाल को डांटे’.




**दैनिक युवक आधार**
**मुंबई / प्रतिनिधी** : भारतीय जनता पक्षाला महिला आरक्षणावर बोलण्याचा काहीही अधिकार नाही. भाजपाची विचारसणी ही गोलवलकर यांच्या बंच ऑफ थॉट तसेच मनुस्मृतीवर आधारीत आहे व यामध्ये महिलांना अतिशुद्र समजले आहे. चातुर्वण्र्य व्यवस्थेचा स्विकार करणाऱ्या मनुवादी विचाराच्या पक्षाने आधी बंच ऑफ थॉट व मनुस्मृतीची होळी करावी व मगच महिला आक्षणावर बोलावे, तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या सरसंघचालक पदावर महिलेची नियुक्ती करून दाखवा, असे आव्हान महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिले आहे.

टिळक भवन येथे प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष पुढे म्हणाले की, महिला आरक्षणावर बोलताना भाजपाने महिलांबद्दलचा त्यांचा दृष्टीकोन कोणता ते स्पष्ट करावे. सावित्रिबाई फुले यांनी मुलींची पहिली शाळा सुरु केली, त्यावेळी त्यांच्यावर शेणाचे गोळे मारणारे कोण होते हे भाजपाने सांगावे. सावित्रीबाईंचा या तथाकथीत धर्ममार्तंडांनी छळ केला, त्यामुळे महिलांबद्दल भाजपा दाखवत असलेला पुळका सर्वांना माहित आहे. संसदेत महिला आरक्षण विधेयक २०२३ सालीच सर्व पक्षांच्या पाठिंब्याने मंजूर झालेले आहे, १६ एप्रिलला जे विधेयक लोकसभेत मांडले होते ते डिलिमिटेशनचे होते, या विधेयकाआडून भाजपाला देशाचे तुकडे करायचे होते. तर मुंबई व महाराष्ट्राचा गायपट्टा करायचा होता. भाजपाचे नेते डिलिमिटेशनवर काहीच बोलत नाहीत. भाजपाचा हा दुष्ट हेतू इंडिया आघाडीने ओळखला व त्या विधेयकाला विरोध केलेला आहे. भाजपा मात्र विरोधी पक्षांना महिला विरोधी ठरवत आहे. महिलांना सर्वात प्रथम काँग्रेस पक्षाने स्थानिक स्वराज्य संस्थेत ३३ टक्के आरक्षण दिले नंतर ते वाढवून ५० टक्के केले. महिला आरक्षणाच्या नावावर राजकारण करण्याचे धंदे भाजपाने बंद करावेत, असेही सपकाळ यांनी म्हटले आहे.

**भाजपाच्या धमक्यांना घाबरु नका..**

महिला आरक्षणाच्या मुद्द्यावर भाजपाने वरळीत काढलेल्या मोर्चावेळी एका स्थानिक महिलेने संताप व्यक्त करत मंत्री गिरीश महाजन यांना खडे बोल सुनावले. या महिलेने मोर्चाचा त्रास झाला म्हणून संताप व्यक्त केला व ते सर्वजगभर पसरले. आपली नाच्चकी झाली हे लक्षात आल्याने आता भाजपाचे लोक मोर्चाचे वार्तांकन करण्यासाठी उपस्थित असलेल्या पत्रकारांनाच धमक्या देत आहेत. हा व्हिडिओ काँग्रेसच्या ट्विटर हँडलवरूनही पोस्ट केला, तो काँग्रेसकडून कोठून आला अशी विचारणा करण्यात येत आहे. पण अशा धमक्यांना काँग्रेस घाबरत नाही व पत्रकारांनीही भाजपाच्या धमक्यांना घाबरू नये, असेही सपकाळ म्हणाले.

**खरगेंच्या विधानाचा चुकीचा अर्थ लावला...**

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांच्या विधानाची मोडतोड करून ते दाखवले जात आहे, खरगे यांच्या विधानाचा चुकीचा अर्थ लावला जात आहे. नरेंद्र मोदी हे ईडी व सीबीआयच्या मदतीने दहशतीचे राजकारण करत आहेत. भाजपाने या विधानावर निवडणूक आयोगाकडे तक्रार केल्याचे समजते पण निवडणूक आयोगाने तामिळनाडू, पश्चिम बंगाल आसाममध्ये निवडणुकीच्या वेळी भाजपाकडून काय काय प्रकार केले, त्याकडेही डोळे उघडे ठेवून पहावे, असेही हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे.

# अतिक्रमणधारकांना मोठा दिलासा! निफाडमध्ये ‘अनधिकृत’ घरांना मिळणार कायदेशीर ओळख

**दैनिक युवक आधार**
**राजेश भडांगे निफाड तालुका प्रतिनिधी** : निफाड तालुक्यातील शासकीय जमिनीवरील निवासी अतिक्रमण धारकांसाठी प्रशासनाने मोठा दिलासा देणारा निर्णय घेतला असून, ‘अनधिकृत’ घरांना आता कायदेशीर ओळख मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. महसूल व वन विभागाच्या वतीने निवासी अतिक्रमणे नियमित करण्यासाठी विशेष मोहीम सुरू करण्यात आली असून, पात्र नागरिकांनी दि. ८ मे २०२६ पर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

दि. २५ मार्च २०२६ च्या शासन निर्णयानुसार ही मोहीम राबविण्यात येत आहे.



या पार्श्वभूमीवर प्रांताधिकारी डॉ. शशिकांत मंगरुळे यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार, दि. २२ एप्रिल रोजी ऑनलाईन बैठक घेण्यात आली. बैठकीस तहसिलदार विशाल नाईकवाडे, गटविकास अधिकारी नम्रता जगताप, मुख्याधिकारी किरण देशमुख, श्रिया देवचक्के, धिरज भामरे तसेच उपअधीक्षक भूमी अभिलेख राजेंद्र भाबड उपस्थित होते.

बैठकीत संबंधित अधिकाऱ्यांना शासन निर्णयाची सविस्तर माहिती देत अंमलबजावणीबाबत सूचना देण्यात आल्या. शासनाच्या निकषांनुसार दि. १ जानेवारी २०११ पूर्वीची व सध्या अस्तित्वात असलेली निवासी अतिक्रमणेच नियमित केली जाणार आहेत.

संबंधित जागा केवळ स्वतःच्या वास्तव्यासाठी वापरलेली असणे आवश्यक आहे.

या मोहिमेनुसार ५०० चौ. फुटांपर्यंतची अतिक्रमणे विनामूल्य नियमित केली जाणार आहेत. ५०० ते १५०० चौ. फुटांपर्यंतच्या अतिक्रमणांसाठी अतिरिक्त क्षेत्रावर बाजारमूल्याच्या १० टक्के शुल्क आकारले जाणार असून, १५०० चौ. फुटांपेक्षा जास्त अतिक्रमणे नियमित केली जाणार नाहीत.

पात्र लाभार्थ्यांनी अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे व कुटुंबाच्या नावावर महाराष्ट्रात एकच अतिक्रमण असल्याचे शपथपत्र सादर करणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील नागरिकांनी ग्रामसेवकांकडे, तर नगर परिषद व नगर पंचायत क्षेत्रातील नागरिकांनी संबंधित मुख्याधिकाऱ्यांकडे अर्ज सादर करावेत.

नियमित करण्यात आलेली जमीन पती-पत्नीच्या संयुक्त नावाने ‘भोगवटादार वर्ग-२’ म्हणून देण्यात येणार असून, पुढील पाच वर्षे त्या जमिनीची विक्री किंवा हस्तांतरण करता येणार नाही.

गायरान, नदी-नाले, सार्वजनिक रस्ते, स्मशानभूमी, वन जमीन तसेच धोकादायक क्षेत्रांवरील अतिक्रमणे या योजनेत समाविष्ट नसतील.

तरी पात्र नागरिकांनी या संधीचा लाभ घेऊन वेळेत अर्ज सादर करावेत, अन्यथा अनधिकृत अतिक्रमणांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

# स्वच्छता दूत फाउंडेशनची राज्यभर स्वच्छता मोहीम

**दैनिक युवक आधार**
**मुंबई / रमेश औताडे** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या पार्श्वभूमीवर गेल्या १४ दिवसांपासून स्वच्छता दूत फाउंडेशन तर्फे राज्यभर स्वच्छता प्रशिक्षण व जनजागृती मोहिमेला मोठा प्रतिसाद मिळत आहे. अशी माहिती फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष मुकेश पाखरे यांनी दिली. स्वच्छता मनाची स्वच्छता घराची स्वच्छता परिसराची स्वच्छता देशाची अशा पद्धतीने संपूर्ण महाराष्ट्रभर हा संदेश घुमला.

या मोहिमेत गावपातळीपासून शहरांपर्यंत स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्यासाठी प्रशिक्षण शिबिरे, प्रात्यक्षिके आणि जनजागृती केली. आपला परिसर स्वच्छ मोहीम कार्यक्रमाचे आयोजन फाउंडेशनचे अध्यक्ष मुकेश पाखरे, रिविका पाखरे व मार्गदर्शक रीना राव यांनी केले.राज्याच्या विविध भागांत रस्ते, सार्वजनिक ठिकाणे, शाळा परिसर, तसेच वस्ती भागांमध्ये स्वच्छता उपक्रम राबवून परिसर स्वच्छ ठेवण्याचा संकल्प करण्यात आला. डॉ. आंबेडकर यांच्या समतेच्या आणि स्वच्छ समाजाच्या विचारांना अभिवादन म्हणून ही मोहीम राबविण्यात येत असून, नागरिकांनीही याला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला आहे.




# 22 कोटी खर्च तरी काम कुठे? पनवेल औद्योगिक वसाहतीतील प्रकल्पावर RTIद्वारे उघड होणार वास्तव

**दैनिक युवक आधार**
**दिपक कोळवनकर पनवेल प्रतिनिधी :** पनवेल औद्योगिक सहकारी वसाहतीत रस्ते, गटारे, ड्रेनेज व पाणीपुरवठा यांसाठी सुमारे 22 कोटी रुपयांचा प्रकल्प सुरू असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. मात्र या प्रकल्पाच्या प्रत्यक्ष कामाची प्रगती, दर्जा आणि खर्च याबाबत नागरिकांमध्ये मोठा संभ्रम निर्माण झाला आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, एवढ्या मोठ्या निधीचा वापर नेमका कसा होत आहे, याबाबत कोणतीही स्पष्ट आणि सार्वजनिक माहिती उपलब्ध नाही. अनेक ठिकाणी कामांची गती मंद असल्याची तसेच काही ठिकाणी कामांच्या गुणवत्तेबाबत शंका उपस्थित केल्या जात आहेत.

या पार्श्वभूमीवर संबंधित प्रशासनाकडून सविस्तर व अधिकृत माहिती मिळावी यासाठी माहितीचा अधिकार (RTI) अंतर्गत अर्ज दाखल करण्यात आला आहे. सदर अर्जामध्ये प्रकल्पाचा सविस्तर अहवाल (DPR), टेंडर प्रक्रिया, कंत्राटदारांची माहिती, खर्चाचा तपशील तसेच कामांच्या गुणवत्ता तपासणीचे अहवाल मागविण्यात आले आहेत.




नागरिकांचा मुख्य प्रश्न असा आहे की, 22 कोटी रुपयांचा निधी पारदर्शक पद्धतीने वापरला जात आहे का? तसेच ही कामे नियोजित वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण होणार का?

प्रशासनाने याबाबत तातडीने खुलासा करून नागरिकांचा संभ्रम दूर करावा, तसेच प्रकल्पाची सध्यस्थिती आणि प्रगती अहवाल सार्वजनिकरित्या जाहीर करावा, अशी जोरदार मागणी होत आहे.

# साकोली येथे बुद्ध पौर्णिमेनिमित्त 5 मे ला कव्वालीच्या प्रबोधनात्मक कार्यक्रम

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे/भंडारा** -बुद्ध पौर्णिमेनिमित्त महामाया ग्रुप साकोली शेंदुरवाफा डॉ बाबासाहेब आंबेडकर तालुका स्मारक समिती येथे 5 मे ला बुद्ध पौर्णिमेनिमित्त कार्यक्रम सायंकाळी 6 वाजता विकास राजा यांच्या कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे



या कार्यक्रमाप्रसंगी खासदार प्रशांत पडोळे,आमदार नाना पटोले, सभापती शितल राऊत, माजी सभापती मदन रामटेके, हर्षल मेश्राम , सामाजिक कार्यकर्ते अमोल टेंभुर्णे, व इतर मान्यवरांच्या उपस्थित संपन्न होणार असून जास्तीत जास्त संख्येने या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे महामाया ग्रुपचे आयोजक व सामाजिक कार्यकर्ते अमोल टेंभुर्ण व ग्रूप यांनी एका प्रसिद्धी पत्रकात कळविले आहे

# बळीराज सेना या राजकीय पक्षाचा ३ रा वर्धापन दिन सोहळा उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर :** बळीराज सेना या राजकीय पक्षाचा ३ रा वर्धापन दिन सोहळा दादर येथील देवराज हॉल येथे अक्षय तृतीयेच्या पवित्र दिनी मोठ्या उत्साहात पार पडला. सर्वप्रथम बळीराज सेना पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अशोक दादा वालम यांचे औक्षण करण्यात आले, त्यानंतर दिपप्रज्वलन करुन छत्रपती शिवाजी महाराज आणि बहुजनांचा दानशूर राजा बळीराजा यांना पुष्पहार अर्पण करण्यात आले. बळीराज सेना पक्षाचे दिवंगत नेते निसर्गवासी नंदकुमार मोहिते आणि निसर्गवासी कृष्णा कोबनाक यांना पुष्पहार अर्पण करुन त्यांना श्रध्दांजली वाहण्यात आली.

अध्यक्ष तसेच मान्यवरांचा सत्कार करुन, डिजिटल मिडीया प्रमुख दिनेश हरड व त्यांच्या टिमने तयार केलेलं पक्ष संघटन आणि कार्यकर्ता सक्षमीकरण यांचे प्रेझेंटेशन अ‍ॅड. विनेश वालम यांनी उपस्थितांना समजावून सांगितले. प्रेझेंटेशनमध्ये बळीराज सेना पक्षाने आतापर्यंत केलेल्या कामाचा आढावा आणि पुढील राजकीय यशस्वी वाटचालीसाठी तयार केलेला रोडमॅप दाखविण्यात आला. भविष्यकाळात आपल्या पक्षाने कोणती कार्ये केली पाहिजेत यांचे नियोजन सर्व कार्यकर्त्यांना समजावून सांगितले.




त्यानंतर बळीराज सेनेचे कार्यकर्ते असलेले विविध विभागातील पदाधिकारी शहापूरचे मा. श्री. दशरथ भोईर, अंधेरीचे मा.श्री. संतोष चव्हाण, नाणार रिफायनरी विरोधक मा. सौ. मानसी धनावडे यांनी आपले अनुभव सर्वांसमोर कथन केले.

बळीराज सेना महाराष्ट्र राज्य संघटक डॉ. प्रकाश भांगरथ यांनी आपल्या भाषणामध्ये संबोधतांना शामराव पेजे आर्थिक विकास वित्त महामंडळामध्ये प्रत्येक जिल्हयासाठी कर्जाव्दारे व्यवसाय निर्मिती करण्यासाठी विशेष राखीव निधी ठेवण्यात आला आहे त्यांचा जास्तीत जास्त फायदा व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींनी घ्यावा असे सांगितले आणि त्यांनी केलेल्या कार्याचा अहवाल सर्व सभागृहासमोर सादर केला. कृषी तज्ञ, जेष्ठ कृषी सल्लागार, ४० वर्षाचा कृषी क्षेत्राचा अनुभव असलेले आणि बळीराज सेनेचे निवडणूक, सहकार, कृषी, उद्योग, व्यापार निर्यात, रोजगार-स्वयंरोजगार महाराष्ट्र राज्य संपर्क प्रमुख विनायकराव भुसारेपाटील यांनी आपल्या भाषणात सांगताना, प्रत्येक तालुक्यात एक तरी कृषी केंद्र असावे, कृषी मालासाठी शासनाने जागा उपलब्ध करुन देणे, विविध स्वयंरोजगार उपलब्ध करुन तरुण व्यावसायिकांना कृषी क्षेत्रात उतरण्यासाठी आवाहन करण्याचे आश्वासन दिले. बळीराज सेना उपाध्यक्ष तथा कोकण बचावासाठी नेहमीच आंदोलने, मोर्चा काढणारे जेष्ठ राजकीय नेते सुरेश भायजे यांनी आपले राजकीय अनुभव सर्व कार्यकर्त्यांना सांगून आपल्या न्याय्य हक्कासाठी आंदोलने मोर्चा का काढली पाहिजेत याचे स्पष्टीकरण दिले. बळीराज सेना सरचिटणीस प्रकाश तरळ यांनी कार्यकर्त्यांना सांगितले की, येणाऱ्या राजकीय घडामोडींवर लक्ष ठेवून २०२९ ची निवडणूक ही आपल्यासाठी कशी फायदेशीर आहे, त्याचा अभ्यास करुन कार्यकर्त्यांनी निवडणूक लढविण्यासाठी तयारीत राहिले पाहिजे असे आवाहन केले. अध्यक्षीय भाषणांत बोलतांना अशोकदादा वालमसाहेब यांनी सर्व कार्यकर्त्यांनी सर्वप्रथम छोटे-मोठे व्यवसाय सुरु करुन आपल्या पोटाचा प्रश्न सोडवावा आणि नंतरच राजकारणात यावे, बळीराज सेनेच्या वतीने कार्यकर्त्यांना विविध व्यवसाय सुरु करुन देण्यासाठी लवकरच दोन दिवसीय अधिवेशन घेण्यात येणार असून त्यात कार्यकर्ता प्रशिक्षण शिबीर, भाषण कौशल्य, कार्यकर्ता जोडणे, व्यवसाय प्रशिक्षण शिबीर, ज्यांना खरोखरच व्यवसाय करावयाचा आहे त्यांनीच या शिबिरात भाग घ्यावा असे आवाहन केले. राजकारणात असतांना सरकारविरोधात आवाज उठवितांना फक्त पत्र व्यवहार न करता आंदोलनेव्दारे तसेच मोर्चा काढून कसे त्यांना वेठीस आणू शकतो यांची उदाहरणे देत ८३ नंबरमध्ये कुणबी जात समाविष्ट करण्यासाठी कसे आंदोलन केले, दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना निवेदन देवून मुंबईतील चाकरमानीला 'कोकणवासी' संबोधण्यासाठी सरकारी परिपत्रक काढले, गेली १८ वर्षे रखडलेल्या मुंबई-गोवा महामार्गाचे काम त्वरीत चालू करुन २२ कोटीचा निधी उपमुख्यमंत्री यांच्याहस्ते उपलब्ध करुन दिला. आशा वर्कस, अंगणवाडी सेविका यांना न्याय मिळवून दिला. स्कूल व्हॅनचा वर्षानुवर्षे रखडलेला प्रश्न शासनदरबारी चर्चा करुन मार्गी लावला, शेतकरी, कामगार आणि वंचित घटकांच्या हक्कासाठी आपण सातत्याने लढा देत आहोत, हीच आपल्या कार्याची खरी ओळख आहे. पक्षाच्या पुढील राजकीय वाटचालीसाठी सर्वांना शुभेच्छा देवून अध्यक्षांनी सर्व कार्यकर्ते यांना २०२९ च्या निवडणूकीसाठी आतापासून तयारीला लागा असे आवाहन केले. पत्रकार शरद मोरे व डिजिटल मिडीया प्रमुख दिनेश हरड यांचा विशेष सन्मान करण्यात आला. तसेच बळीराज सेना पक्षातर्फे निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांचाही विशेष सन्मान करण्यात आला.

हा कार्यक्रम सर्वोतोपरी यशस्वी करण्यासाठी युवा नेतृत्व अ‍ॅड. विनेश वालम यांच्या कुशल नेतृत्वाखाली मनोहर पवार, मनोहर डोंगरे, विजय मांडवकर, अनिल मोंडे, संतोष टक्के आणि सहकारी यांनी बहुमोल सहकार्य केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन पक्षाचे सरचिटणीस मा. श्री. संभाजी काजरेकर यांनी यशस्वीरित्या सर्व कार्यक्रमाची रुपरेषा मुद्देसुद मांडून वेळेचे नियोजन करुन पार पाडले. तसेच कार्यक्रमाची सांगता बळीराज सेना युवती अध्यक्षा मा. सौ. स्वरा चोगले यांनी केले. त्यांनी सर्व उपस्थितीतांचे आणि मान्यवरांचे, कार्यक्रमाला सहकार्य करणाऱ्या व्यक्तींचे शतशः आभार मांडले.

# शुद्ध भोजन व शांत झोप म्हणजे विकास - चैत्रामजी पवार

## सेलूत कै. मेधा अनिरुद्ध पिंपळगावकर यांच्या स्मरणार्थ व्याख्यानमालेचे पुष्प गुंफले

**दैनिक युवक आधार**

**सेलू(प्रतिनिधी) शिवाजी पवार** : आपल्या सभोवतालचे पर्यावरण अबाधीत ठेवणे, तसेच जंगल, जल, शेती, संघटन व गोपालन यासाठी अविरतपणे प्रयत्न करत राहणे, राष्ट्राचे हित जोपासणे, जेणेकरून आपले आरोग्य सुदृढ राहील यासाठी सतत प्रयत्न करत राहणे, एवढेच नव्हे तर शुद्ध भोजन आणि शांत झोप म्हणजेच विकास असल्याचे, प्रतिपादन पद्मश्री चैत्रामजी पवार यांनी केले आहे.

ते येथील कै. मेधा अनिरुद्ध पिंपळगावकर यांच्या स्मरणार्थ आयोजित व्याख्यानमालेतील दुसऱ्या वर्षीचे पुष्प गुंफताना नूतन विद्यालयातील सभागृहात सोमवार २० एप्रिल रोजी बोलत होते. यावेळी समारंभाचे अध्यक्ष म्हणून दत्तात्रय माकोडे यांची प्रमुख उपस्थिती होती. लोकसहभागातून पर्यावरण रक्षण व शेती विकास या विषयावर बोलताना ते म्हणाले की, मी ज्या भागात राहतो तो भाग गुजरात व महाराष्ट्राच्या सीमेवर आहे. धुळे जिल्ह्यातील बारीपाडा हे गाव सोयीसुविधा पासून कोसो दूर होते .या गावाचा आणि विकासाचा कोठेही संबंध आलेला नव्हता . इथे रस्ते व पाण्याचा तुटवडा होता. अशा गावात सण १९९० साली वृक्ष लागवड सुरू केली .५ हजार वृक्ष लावली .मात्र काम थांबवले .दरम्यान नांदेड येथून केटला नावाचा एक युवक येथे आला .वैद्यकीय क्षेत्रातील एम.डी. पदवी धारण केलेला ,हा डॉक्टर संपर्कात आल्यानंतर त्याच्याकडून आम्हाला प्रेरणा मिळाली .आणि त्यानंतर इथे कापल्या जाणारे वृक्ष सर्वप्रथम थांबवले जाणे गरजेचे आहे. व्यसनाधीनतेने ग्रासलेल्या गावाला संघटित करणे गरजेचे आहे. त्यासाठी वनवासी कलाश्रम




यांच्याकडून एक दूरदर्शन संच उपलब्ध करून रामायण मालिका दाखवण्याचा प्रयोग केला. त्यानंतर सन १९९२ ला ६० माणसाचा गट तयार करून, वृक्षतोड थांबवण्यासाठी वॉचमन ची नियुक्ती केली. वन संवर्धनासाठी म्हणून २२ वर्षांपूर्वी घराघरात गॅस उपलब्ध करून दिला. सोलार कुकर, सोलार चूल, हे देखील या गावात उपलब्ध करून दिले. बेकायदेशीर वृक्षतोड केल्यास दंड आकारण्यात आला. ४३५ प्रजातींचे वृक्ष तीस वर्षात लावून आज तीन हजार कोटीचे जंगल उभे करण्यात आले आहे. ४८ प्रकारची पक्षी येथे वास्तव्य करतात. श्रमदानातून छोटे छोटे बांध बांधले ,त्यांची एकूण संख्या ७०० बंधारे इतकी पोहोचली .५ हजार मीटर चर खोदला. प्रतिवर्षी त्यात १५ कोटी लिटर पाणी आदिवासी माणूस आडवुन ठेवत आहे .जंगल आणि शेती यामध्ये परंपरागत शेती जोपासण्याचा प्रयत्न आम्ही केला. २५० एकर बागायती शेती आहे. त्यामुळे येथे सात प्रकारचे भगरीचे पीक घेण्यात येते. इंद्रायणी तांदूळ आम्ही पिकवतो .येथे गोपालन करून शेणखत व दुधाची उपलब्धता तयार केली आहे. सरसंघ चालक मोहन भागवत यांनी ५ डिसेंबर २०१७ रोजी भेट दिल्यानंतर ,बारीपाडा सह इतर ४४ गावात असे उपक्रम राबवून २७ हजार एकर म्हणजेच ११,१०० हेक्टर जमिनीवर ८० लाखापेक्षा जास्त झाडी वाढवली. यामुळे जीवन औषध व पर्यावरण हे दोन्ही साध्य झाले . सन २००३ मध्ये नंदुरबार येथे पहिला आदिवासी हिंदू अस्मिता पुरस्कार मला मिळाला .तसेच पद्मश्री पुरस्काराने देखील शासनाने मला सन्मानित केले .हा माझा एकट्याचा सन्मान नसून संपूर्ण आदिवासी ,वनवासी मानवाचा व माझ्या गावातील प्रत्येकाचा सन्मान असल्याचे यावेळी बोलताना चैत्रामजी पवार यांनी स्पष्ट केले.

तसेच २००३ पासून वन भाजी स्पर्धा सुरू केली. त्याला महिलांचा अतिशय उत्तम प्रतिसाद मिळाला. महिलांनी ६० गावातून ६२० महिलांनी सहभाग घेऊन शिजवून भाज्या आणल्या. एका मुलीने तर एका डिशमध्ये २५० भाजी शिजवून आणल्या. माझ्या गावावर कॅनडा येथील मुलाने तर जर्मनी येथील महिलेने पीएचडी केली. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे आज जे महायुद्ध सुरू आहे त्यामुळे गॅस टंचाई निर्माण झाली आहे. म्हणून माझ्या गावातील ३०० घरांनी सहा महिन्यासाठी गॅस बंद केला आहे .हे वनवासी कलाश्रमाचे मोठे यश आहे .आपण राष्ट्रासाठी काय करू शकतो हा भाव सर्वात महत्त्वाचा आहे .असेही यावेळी बोलताना चैत्रमजी पवार यांनी स्पष्ट केले. दत्तात्रय माकोडे यांनी अध्यक्षीय समारोप केला. मुख्याध्यापक संतोष पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. भगवानसिंग राठोड यांनी वैयक्तिक पद्य सादर केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन देवहुती गांजापुरकर हीने केले , तर श्रीकांत देशमुख यांनी आभार मानले . वैष्णवी पिंपळगावकर हिने गायलेल्या वंदे मातरमने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमासाठी श्रोत्यांची मोठी उपस्थिती होती.

# गलवाडा येथे तरुणांना व्यसनमुक्ती,संस्कार व शिक्षणाचा संदेश - शिवविख्याते सूरज आगे

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी/ विजय काळे** : सोयगाव तालुक्यातील गलवाडा येथे शिवजयंती निमित्त २१ एप्रिल रोजी जाहीर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाचे आयोजन आनंदा गरबड इंगळे यांनी केले होते.

या वेळी सुप्रसिद्ध शिवव्याख्याते सूरज आगे यांनी आपल्या प्रभावी आणि ओजस्वी शैलीत छत्रपती शिवाजी महाराज यांचे शिवचरित्र उलगडून सांगत उपस्थित श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. त्यांच्या भाषणातून शिवाजी महाराजांच्या कार्याची, पराक्रमाची आणि दूरदृष्टीची सखोल माहिती मिळाली. व्याख्यानादरम्यान त्यांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना कशी झाली, याचे विवेचन करताना सामाजिक ऐक्याचे महत्त्व अधोरेखित केले. शिवाजी महाराजांनी सर्व समाजघटकांना एकत्र आणून ‘अठरा पगड जातींचे मावळे’ घडवले, हा आदर्श




आजच्या समाजासाठीही प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले.तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संघर्षमय जीवनाचा दाखला देत त्यांनी तरुणांना सकारात्मक मार्ग निवडण्याचे आवाहन केले. आत्महत्येसारख्या टोकाच्या निर्णयांपासून दूर राहून शिक्षण, कष्ट आणि संघर्ष यांच्या जोरावर जीवनात यश संपादन करावे,असा संदेश त्यांनी दिला.यावेळी त्यांनी कुटुंबातील संस्कारांचे महत्त्व अधोरेखित करत पालकांनी मुलांना योग्य दिशा देण्याची गरज व्यक्त केली. तसेच व्यसनांपासून दूर राहणे, चांगल्या सवयी लावणे आणि समाजात सकारात्मक योगदान देणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले.

आजच्या तरुणांनी मोबाईलचा अतिरेक टाळून व्यायाम, खेळ आणि शारीरिक तंदुरुस्ती यांना प्राधान्य द्यावे,अन्यथा आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो,असा इशाराही त्यांनी दिला. याशिवाय अंधश्रद्धा आणि खोट्या बाबाबुवांच्या मागे लागू नये, विवेकबुद्धीचा वापर करावा, असा मोलाचा सल्लाही त्यांनी दिला.या व्याख्यानामुळे उपस्थित श्रोते भारावून गेले होते.अनेकांनी या कार्यक्रमातून प्रेरणा मिळाल्याची भावना व्यक्त केली.कार्यक्रमाच्या शेवटी आयोजक आनंदा इंगळे यांनी उपस्थित मान्यवर व ग्रामस्थांचे आभार मानले. यावेळी गावातील अनेक तरुण व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पनवेलमध्ये वाहतूक कोंडी व प्रदूषणावर तोडगा ; ‘ पॉड टॅक्सी ’ प्रकल्पाची संकल्पना पुढे ; नगरसेविका सायली सरक यांचा पुढाकार

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर):** पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील वाढत्या वाहतूक कोंडी व प्रदूषणाच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी ‘पॉड टॅक्सी’ प्रकल्पाची संकल्पना पुढे आली आहे. शिवसेनेच्या नगरसेविका सायली सरक यांनी हा अभिनव प्रस्ताव मांडला असून, शहराच्या भविष्यातील वाहतूक व्यवस्थेसाठी तो महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे मानले जात आहे.

खारघर, कामोठे, कळंबोली, नवीन पनवेल आणि पनवेल या भागांमध्ये दिवसेंदिवस वाहनांची संख्या वाढत असून, त्यामुळे वाहतूक कोंडी आणि वायू प्रदूषण गंभीर समस्या बनली आहे. यावर शाश्वत उपाय म्हणून पॉड टॅक्सी प्रणाली



प्रभावी ठरू शकते, असे मत सायली सरक यांनी व्यक्त केले आहे. या संदर्भात त्यांनी राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. या प्रकल्पाबाबत सरनाईक यांनी सकारात्मक भूमिका दर्शवली असून, पनवेलमध्ये पॉड टॅक्सी सुरू करण्याबाबत अनुकूलता दाखवली आहे. तसेच, नगरसेविका सरक यांनी महापौर नितीन पाटील आणि महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांनाही यासंदर्भात निवेदन दिले आहे. शहरातील वाढती लोकसंख्या आणि वाहतुकीचा ताण लक्षात घेता, भविष्यातील गरज ओळखून पालिकेमार्फत लवकरच सर्वेक्षण करण्यात येणार असून, त्यानुसार पॉड टॅक्सी प्रकल्प राबविण्याबाबत निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन प्रशासनाकडून देण्यात आले आहे.

दरम्यान, या उपक्रमावेळी कळंबोली शिवसेना शहर प्रमुख तुकाराम सरक यांच्यासह श्रीकांत फाळके, महेश गोडसे, निलेश दिसले, प्रेम डांगे, प्रेम गोडसे, सुनील खताळ, अंकित सरगर आदी शिवसैनिक उपस्थित होते. शहराच्या वाहतूक व्यवस्थेत आमूलाग्र बदल घडवून आणण्याची क्षमता असलेल्या या प्रकल्पाकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# मध्य रेल्वेचा ब्लॉक; काही गाड्यांच्या धावण्यात तात्पुरते बदल

**दैनिक युवक आधार**

**परभणी,(प्रतिनिधी)** : मध्य रेल्वेकडून कल्याण-कसारा दरम्यान तिसऱ्या मार्गाच्या कामांतर्गत खरडी यार्ड रिमॉडेलिंगची कामे सुरू करण्यात आली आहेत. या पार्श्वभूमीवर 24 आणि 25 एप्रिल रोजी ब्लॉक घेण्यात येणार असून, काही महत्त्वाच्या रेल्वे गाड्यांच्या धावण्यात तात्पुरते बदल करण्यात आले आहेत.

24 एप्रिल रोजी सुटणारी गाडी क्रमांक 17611 हजूर साहिब नांदेड-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस राज्य राणी एक्सप्रेस ही मनमाडपर्यंतच धावणार आहे. मनमाड ते मुंबई दरम्यानचा प्रवास रद्द करण्यात आला आहे. तसेच 25 एप्रिल रोजी सुटणारी गाडी क्रमांक 17612 छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-हजूर साहिब नांदेड राज्य राणी एक्सप्रेस ही मनमाड येथूनच सुटणार असून, मुंबई ते मनमाड हा प्रवास रद्द राहणार आहे.

याशिवाय काही गाड्यांचे मार्गही बदलण्यात आले आहेत. 25 एप्रिल रोजी सुटणारी गाडी क्रमांक 11001 छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-बल्लारशा नंदीग्राम एक्सप्रेस ही कल्याण-कर्जत-पुणे-मनमाड मार्गे वळविण्यात येईल. तसेच गाडी क्रमांक 17057 छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-लिंगमपल्ली देवगिरी एक्सप्रेस ही कल्याण-लोणावळा-पुणे-मनमाड मार्गे धावेल.रेल्वे प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, पायाभूत सुविधांचा विकास आणि भविष्यातील वाहतूक अधिक सुरक्षित व सक्षम करण्याच्या दृष्टीने ही कामे हाती घेण्यात आली आहेत.

प्रवाशांनी या बदलांची नोंद घेऊन आपल्या प्रवासाचे नियोजन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# अक्षय कर्डिले हेच राहुरीचे आमदार होणार-ज्ञानेश्वर अहिरे

## ज्ञानेश्वर अहिरे यांच्या वक्तव्याने अक्षय कर्डिले यांचा विजयाचा मार्ग मोकळा

**दैनिक युवक आधार**

**लोणी : राहुरी** विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणुकीची रणधुमाळी सुरू असून या मतदारसंघात निर्णय मतदान असलेला आदिवासी भिल्ल समाज नेमका कुणाबरोबर जाणार या चर्चा रंगल्या असतांना आज एकलव्य आदिवासी सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष ज्ञानेश्वर अहिरे यांनी अक्षय कर्डिले हेच राहुरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार होणार असे वक्तव्य केल्याने अक्षय कर्डिले यांचा विजयाचा मार्ग मोकळा झाला आहे.

राहुरी विधानसभा मतदारसंघात आदिवासींचे जवळपास ४५ हजार पेक्षा जास्त मतदार आहेत त्यामुळे हे मतदान ज्या उमेदवाराच्या पारड्यात



जाईल तोच उमेदवार राहुरी विधानसभेचा आमदार असेल हे गणित निश्चित झाले होते. त्यामुळे हे मतदान नेमके कोणाला पडणार या चर्चेला मतदारसंघात उधाण आले होते. एकलव्य आदिवासी सेनेने आतापर्यंत कोणालाही जाहीर पाठिंबा न दिल्याने सस्पेन्स वाढला होता त्यातच आज एकलव्य आदिवासी सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष ज्ञानेश्वर अहिरे यांनी अक्षय कर्डिले हेच राहुरीचे आमदार होणार हे विधान केल्याने चर्चेना पूर्णविराम मिळाला आहे. त्यामुळे राहुरी विधानसभा मतदारसंघात अक्षय कर्डिले यांच्या विजयाचा मार्ग मोकळा झाला असल्याचे जाहीरपणे बोलले जात आहे. त्यामुळे या निवडणुकीत केवळ औपचारिकताच शिल्लक राहिली आहे. श्री. अहिरे यावेळी म्हणाले, दिवंगत शिवाजीराव कर्डिले यांना एकलव्य आदिवासी सेनेने जाहीर पाठिंबा दिला होता आणि त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक कामे मार्गी लागली होती परंतु दुर्दैवाने त्यांच्या निधनाने मतदार संघात कामाला ब्रेक लागला. अक्षय कर्डिले त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवून निश्चित अधुरी असलेली कामे पूर्ण करतील असा आम्हाला विश्वास आहे त्यामुळे अक्षय केलेले यांच्या पाठीशी उभे राहण्याचा संघटनेने निर्णय घेतला आहे. ज्ञानेश्वर अहिरे यांच्या वक्तव्याने अक्षय कर्डिले यांचा विजयाचा मार्ग मोकळा झाला असला तरी इतर उमेदवारांच्या गोठात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. सध्या राहुरी मतदार संघात पोट निवडणुकीची रणधुमाळी अंतिम टप्प्यात आहे त्यातच ज्ञानेश्वर अहिरे यांच्या वक्तव्याने निवडणूक एका बाजूने झुकते की काय? अशी चर्चा रंगली आहे.

# भीषण उन्हाळ्यात कडू लिंबाचे झाड ठरतेय वरदान थंडगार सावलीमुळे नागरिकांना मोठा दिलासा

**दैनिक युवक आधार**

**उमरखेड तालुका प्रतिनिधी राजू गायकवाड(मोहदरी)** : राज्यात सध्या उन्हाचा पारा चाळीस अंशांच्या पार गेला असून, दुपारच्या वेळी अंगाची लाहीलाही होत आहे. अशा भीषण उष्णतेत निसर्गाचा अनमोल ठेवा असलेले कडू लिंबाचे झाड सर्वसामान्यांसाठी खऱ्या अर्थाने 'वरदान' ठरत असल्याचे चित्र ग्रामीण आणि शहरी भागात पाहायला मिळत आहे.

इतर झाडांच्या तुलनेत कडू लिंबाची सावली अधिक दाट आणि थंड असते. उन्हाळ्याच्या दिवसात कडू लिंब जास्तीत जास्त ऑक्सिजन उत्सर्जित करतो, त्यामुळे या झाडाखालील तापमान वातावरणापेक्षा ३ ते ५ अंशांनी कमी जाणवते. दुपारच्या वेळी शेतात काम करणारे मजूर असोत वा रस्त्याने जाणारे नागरिक, विश्रांतीसाठी



कडू लिंबाच्या झाडाचाच आधार घेताना दिसत आहे केवळ सावलीच नाही, तर कडू लिंबाचे औषधी गुणधर्मही या काळात महत्त्वाचे ठरतात. उन्हाळ्यात होणारे त्वचेचे विकार, घामोळ्या यांपासून संरक्षण मिळवण्यासाठी लिंबाच्या पाल्याचा वापर केला जातो. तसेच चैत्र महिन्यात लिंबाच्या रसाचे सेवन करणे आरोग्यासाठी हितकारक मानले जाते.शिवाय

वाढत्या तापमानाचा फटका केवळ माणसांनाच नाही, तर पशू-पक्ष्यांनाही बसत आहे. कडू लिंबाची झाडे दाट असल्याने पाळीव प्राणी आणि विविध पक्षी या झाडांच्या आश्रयाला येत आहेत. निसर्गाचे हे थंडगार छत्र जणू 'नॅचरल एअर कंडिशनर'चे काम करत असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

"आजच्या सिमेंटच्या युगात उन्हाच्या झळा सोसताना झाडांचे महत्त्व प्रकर्षाने जाणवत आहे. कडू लिंब हे कमी पाण्यात येणारे आणि वर्षभर टिकणारे झाड आहे. प्रत्येकाने आपल्या परिसरात किमान एक तरी कडू लिंबाचे झाड लावले पाहिजे.

# महामानवाच्या जयंतीनिमित्त 'द इंडियन न्यूज'चा स्तुत्य उपक्रम

## तिरोड्यात १३० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण

**दैनिक युवक आधार**

**सचिन बन्सोड / गोंदिया जिल्हा प्रतिनिधी :** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून तिरोडा येथे एका विशेष सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. 'शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे' हा बाबासाहेबांचा विचार प्रत्यक्ष कृतीत आणत 'द इंडियन न्यूज' समूहाच्या वतीने गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

तिरोडा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक शाळा येथे आयोजित या कार्यक्रमात इयत्ता तिसरी ते आठवीच्या एकूण १३० विद्यार्थ्यांना दर्जेदार नोटबुक आणि पेन देण्यात आले. शैक्षणिक साहित्य हाती पडताच विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद आणि स्मितहास्य पाहायला मिळाले.

**मान्यवरांची उपस्थिती:**

या कार्यक्रमाला 'द इंडियन न्यूज'चे कार्यकारी



संपादक सचिन बन्सोड आणि उपसंपादक साजन रामटेके यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. निलीमा कटरे, सहाय्यक शिक्षिका सौ. ज्योती बिसेन, कु. ममता सोनेवाने, आणि सहाय्यक शिक्षक श्री. सुधीर खोटेले, श्री. बी. एस. पटले व श्री. रावते सर यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

**शिक्षणाचा वारसा पुढे नेणे हीच खरी मानवंदना:**

कार्यक्रमाची सुरुवात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. याप्रसंगी बोलताना कार्यकारी संपादक सचिन बन्सोड म्हणाले की, "केवळ उत्सव साजरा करणे म्हणजे जयंती नाही, तर बाबासाहेबांनी दिलेला शिक्षणाचा वारसा पुढे नेणे हीच खरी त्यांना मानवंदना आहे.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासात छोटीशी मदत म्हणून 'द इंडियन न्यूज'च्या वतीने हा उपक्रम राबवण्यात आला आहे."

उपसंपादक साजन रामटेके यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना जिद्दीने अभ्यास करून यशस्वी होण्याचे आवाहन केले.

**सामाजिक बांधिलकीचे कौतुक:**

माध्यमांनी केवळ बातम्यांपर्यंत मर्यादित न राहता सामाजिक बांधिलकी जपल्याबद्दल परिसरातून 'द इंडियन न्यूज'चे कौतुक होत आहे. या स्तुत्य उपक्रमाबद्दल मुख्याध्यापिका सौ. निलीमा कटरे आणि शिक्षक वर्गाने समूहाचे विशेष आभार मानले. कार्यक्रमाला शिक्षक वृंद आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## भाजपला महिला आरक्षणाच्या नावाखाली स्वत:ची पोळी भाजण्याची घाई!

### कॉंग्रेसच्या सोनललक्ष्मी घाग यांचे मत

**दैनिक युवक आधार**
**उलवे,वार्ताहर** : "केंद्र सरकारने २०२३ मध्ये महिला आरक्षण विधेयक संसदेत मंजूर केलेले असतानाही त्याची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही. त्याऐवजी २०२६ मध्ये पुन्हा महिला आरक्षणाच्या आडून (डेलिमिटेशन) परिसीमन विधेयक संसदेत आणण्याचा प्रयत्न करण्यात येत असून ही संविधान विरोधी कृती आहे. महिला आरक्षणाच्या नावाखाली भाजपला स्वतःची पोळी भाजण्याची घाई झाली आहे. वास्तविक पहिल्यांदा जातीनिहाय जनगणना करणे आवश्यक आहे; परंतु केंद्र सरकार तसे करत नाही. त्यामुळे भाजप सरकारची जनतेला दिशाभूल करण्याची ही खेळी आहे. हे केवळ महिला आरक्षण विधेयक नाही, तर देशाच्या लोकशाही ढाच्यात बदल करण्याचा प्रयत्न आहे. भारतीय संविधानावर आक्रमण करण्याचा प्रकार आहे. त्यामुळे जनतेची दिशाभूल करणाऱ्या विधेयकाला कॉंग्रेस पक्ष कधीही



साथ देणार नाही, ते कायम हाणून पाडेल," असे रत्नागिरी उत्तर जिल्हा कॉंग्रेस कमिटीच्या अध्यक्षा सोनललक्ष्मी घाग यांनी बुधवारी (ता. २२) उलवे येथील कॉंग्रेस पक्षाच्या कार्यालयात पत्रकार परिषदेत सांगितले.

"कॉंग्रेसने नेहमीच महिलांना सत्तेत आणि पक्षातही प्राधान्य दिले आहे. सरोजिनी नायडू, इंदिरा गांधी, प्रतिभाताई पाटील, सोनिया गांधी अशा असंख्य महिलांना कॉंग्रेसने संधी दिलेली आहे. थोडक्यात कॉंग्रेसने नेहमीच महिलांना सत्तेत आणि पक्षातही प्राधान्य दिले आहे," असेही सोनललक्ष्मी घाग यांनी पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तरे देताना सांगितले.

या पत्रकार परिषदेला कॉंग्रेसचे सरचिटणीस मिलिंद पाडगावकर उपस्थित होते. महिला आरक्षण विधेयकाची वस्तुस्थिती नेमकी काय आहे. केंद्र सरकार कशा पद्धतीने जनतेची फसवणूक करीत आहे. हे जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी पत्रकार परिषद आयोजित केली असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी उरण तालुकाध्यक्ष विनोद म्हात्रे, अखलाख शिलोत्री, महिला जिल्हाध्यक्षा रेखा घरत, निर्मलाताई पाटील, विनया पाटील, सारिका पाटील, योगिता नाईक आदी महिला कार्यकर्त्याही उपस्थित होत्या.

# पशुसंवर्धन किसान क्रेडिट कार्ड' योजनेतून 3 लाखांपर्यंत अर्थसहाय्य

## पशुपालकांनी योजनेचा लाभ घ्यावा :- डॉ. संदीप शिंदे

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी / मारुती सत्रे** : राज्यातील पशुपालन, शेळी-मेंढीपालन, कुक्कुटपालन व वराहपालन करणाऱ्या शेतकऱ्यांना आर्थिक बळ देण्यासाठी पशुसंवर्धन विभागामार्फत 'पशुसंवर्धन किसान क्रेडिट कार्ड' (केसीसी) मोहीम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत पशुपालकांना त्यांच्या पशुधनाच्या संगोपनासाठी व दैनंदिन खर्चासाठी (खेळते भांडवल) आकर्षक व्याज सवलतीसह कर्ज उपलब्ध करून दिले जात आहे. जास्तीत जास्त पात्र पशुपालकांनी आपल्या जवळच्या पशुवैद्यकीय दवाखान्याशी किंवा दूध संस्थेशी संपर्क साधून या योजनेचा लाभघ्यावा, असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन आयुक्त डॉ. पाटील यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे.

**KISAN CARD किसान कार्ड**
RuPay



या योजनेंतर्गत ज्या शेतकऱ्यांकडे किसान क्रेडिट कार्ड नाही, त्यांना १ लाख ६० हजार रुपयांपर्यंतचे कर्ज विनातारण उपलब्ध होणार आहे. दूध संस्थेची हमी असल्यास ही मर्यादा ३ लाख रुपयांपर्यंत वाढवता येते. तसेच, ज्यांच्याकडे आधीच किसान क्रेडिट कार्ड आहे, अशा शेतकऱ्यांनाही ३ लाख रुपयांपर्यंतची पतमर्यादा वाढवून घेण्याची सुविधा उपलब्ध आहे. कर्जाचा मूळ व्याजदर ९ टक्के असला

तरी नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना केंद्र शासनाकडून ३ टक्के व राज्य शासनाच्या दि. ११ फेब्रुवारी २०२६ च्या निर्णयानुसार ४ टक्के अशी एकूण ७ टक्क्यांपर्यंत व्याज सवलत मिळते.

याशिवाय बँकांकडून २ टक्के व्याज सवलत दिली जात असल्याने पात्र व नियमित परतफेड करणाऱ्या पशुपालकांना प्रत्यक्षात शून्य टक्के व्याजदराचा लाभ घेता येतो. सन

२०२६-२७ पासून 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना' (राज्य व जिल्हास्तर) अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना या क्रेडिट कार्डद्वारे खेळते भांडवल उपलब्ध होणार आहे.

राज्यातील १० लाख पात्र पशुपालकांना या योजनेच्या कक्षेत आणण्याचे उद्दिष्ट पशुसंवर्धन विभागाने ठेवले आहे. जिल्हास्तरावर 'पशुसंवर्धन उपआयुक्त' हे सनियंत्रण अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. या मोहिमेसाठी दूध सोसायटी, दूध संघ किंवा दूध उत्पादक कंपनीचे सभासद असलेले व अद्याप या योजनेचा लाभ न घेतलेले सर्व पशुपालक पात्र आहेत. सध्या पशुपालन करणाऱ्या व अद्याप या योजनेचा लाभ न घेतलेल्या सर्व पात्र पशुपालकांना या योजनेचा लाभ घेता येणार आहे.

**पात्रता व अटी याप्रमाणे आहेत:**
प्रकल्प धारकाने केंद्र/राज्य शासन /जिल्हा परिषद यांच्या कोणत्याही अनुदान योजनेचा लाभ घेतलेला नसावा, पशुपालन प्रकल्पातील सर्व पशुधनाची 'एनडीएलएम (भारत पशुधन)' पोर्टलवर नोंदणी अनिवार्य आहे, व्याज परतावा सवलत पुढील कमाल पशुधन मर्यादेपर्यंतच लागू राहील: २५,००० मांसल कुक्कुट पक्षी किंवा ५०,००० पर्यंत अंडी उत्पादक कुक्कुट पक्षी, ४५,००० पर्यंत क्षमतेची हॅचरी युनिट, १०० पर्यंत दुधाळ जनावरांचा गोठा, ५०० पर्यंत मेंढी/ शेळी गोठा, २०० पर्यंत वराह, कर्जाची संपूर्ण परतफेड कर्ज उचल केल्याच्या तारखेपासून एक वर्षांच्या आत करणे बंधनकारक आहे. योजनेच्या निकषांनुसार तसेच वेळोवेळी करण्यात येणाऱ्या बदलांनुसार सर्व अटींची पूर्तता करणे आवश्यक राहील, अधिक माहितीसाठी पशुपालकांनी नजीकच्या + पशुवैद्यकीय चिकित्सालयाशी संपर्क साधावा किंवा १९६२ या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा, असेही आवाहन आयुक्त डॉ. पाटील यांनी केले आहे. पशुधनाच्या संगोपनासाठी आर्थिक अडचणी भासू नये, तसेच ग्रामीण भागात पशुधन व्यवसायाला चालना मिळावी, यासाठी जास्तीत जास्त पात्र पशुपालकांन आपल्या जवळच्या पशुवैद्यकीय दवाखान्याशी किंवा दूध संस्थेशी संपर्क साधून या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन डॉ. किरण पाटील, आयुक्त पशुसंवर्धन, पुणे यांनी केले आहे.

# चंद्रकांत घोसाळकर वोकेशनल एक्सलन्स अवॉर्ड ने सन्मानित

### रोटरी क्लब ऑफ पनवेलने जपली सामाजिक बांधिलकी

**दैनिक युवक आधार**
**कळंबोली प्रतिनिधी** : सुधागड तालुक्यातील पाच्छापुर वनवासी बहुल क्षेत्रात उल्लेखनीय सामाजिक शैक्षणिक सार्वजनिक अन सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल रोटरी क्लब ऑफ पनवेल च्या वतीने सोमजाई शिक्षण प्रसारक मंडळाचे विद्यमान अध्यक्ष चंद्रकांत उर्फ दादा घोसाळकर यांना वोकेशनल एक्सलन्स अवॉर्डने एक स्वयंसेवक या नात्याने महत्त्वाचा पुरस्कार देऊन पनवेल येथे रविवारी सन्मानित करण्यात आले. यावेळी सन्मानपत्र शाल श्रीफळ चंद्रकांत घोषालकर यांना रोटरी क्लब ऑफ पनवेलच्या डिस्ट्रिक्ट गव्हर्नर यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

रोटरी क्लब ऑफ पनवेल हे सामाजिक जाणवीतून गेल्या अनेक वर्षापासून समाजकार्य करून सामाजिक बांधिलकी जपत आहेत. समाजातील दीनदुबळे वंचित घटकापर्यंत पोहोचून त्यांना आवश्यक असलेल्या सेवा सुविधा पुरवण्याचं सामाजिक काम हे त्यांच्या क्लबच्या माध्यमातून गेली अनेक वर्षापासून केले जात आहे.गेल्या वर्षी सुधागड तालुक्यातील पाच्छापूर गावात अति दुर्गम भागात सोमजाई शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष चंद्रकांत उर्फ दादा घोसाळकर यांनी निर्माण केलेल्या शाळेची पाहणी रोटरी क्लबच्या सदस्यांनी केली होती.



अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करून दुर्गम भागातील वनवासी, आदिवासी व अन्य समाज बांधवांना शिक्षणाची व्यवस्था त्यांच्या राहण्याच्या ठिकाणीच करून ज्ञानदानाचे कार्य ते अनेक वर्ष करीत आहेत. जनकल्याण पतसंस्थेची निर्मिती करून समाजातील अति गरजूंना व्यवसायासाठी कर्जाची उपलब्धता तत्पर्तने करून त्यांना स्वावलंबी बनवण्याचे कामही त्यांनी ते करत आहेत. राजकीय क्षेत्रामध्ये सुद्धा काम करून त्यांनी ग्रुप ग्रामपंचायत पाच्छापूरचे सरपंच अनेक वर्ष सांभाळून शासनाच्या विविध योजना ह्या पाच्छापूरच्या पंचकोशीत कार्यान्वित केलेले आहेत.सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि राजकीय क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवणाऱ्या सुधागड तालुक्यातील चंद्रकांत उर्फ दादा घोसाळकर यांचा वोकेशनल एक्सलीएन्स अवॉर्ड ने पुरस्कारित करून गौरव करण्यात आला. यावेळी रोटरी क्लबचे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर संतोष मराठे, असिस्टंट गव्हर्नर सुरेश शेडगे,रोटरीचे पदाधिकारी डॉ.दीपक पुरोहित, डॉ. शैलेश पालेकर, रोटरी क्लबचे अध्यक्ष स्मिता मंडलिक सेक्रेटरी डॉ. अरविंद कुलकर्णी,सोमजाई शिक्षण प्रसारक मंडळाच्या माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक दीपक उत्तम माळी,सुधागड तालुक्यातील भाजपचे युवा नेतृत्व रोहन दगडे तसेच घोसाळकरांचे कुटुंबीय या गौरव समारंभाच्या वेळी उपस्थित होते.दादा घोसाळकरांचा रोटरी क्लब ने केलेल्या गौरवा बद्दल सुधागडसह रायगड मधील सामाजिक शैक्षणिक राजकीय सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन केले आहे. रोटरी क्लब ऑफ पनवेल कडून या दुर्गम भागातील शाळेमध्ये ई लर्निंग किट सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असून दोन शौचालया वरील शेडची बांधणी ही रोटरी क्लब च्या माध्यमातून विद्यालयात केली जाणार असल्याचे यावेळी घोषित करण्यात आले आहे.

## इंडियन कॉपीराईट प्रोटेक्शन( ॲन्टी पायरेसी सेल) मुंबई आयोजित राज्यस्तरीय भारत सन्मान

### पुरस्कार सोहळ्यात प्रतिभावंतांचा सत्कार,राममजित (जितू) गुप्ता याचे उत्कृष्ट नियोजन

**दैनिक युवक आधार**
**कल्याण प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर** : आदर्श व्यक्तिमत्व, निस्वार्थी सेवा, गरिबांचे कैवारी, समाजसेवक हाच धर्म,असे चतुरस्त्र प्रतिभावंत व्यक्तिमत्व म्हणजे रामजित(जितू) महादेव गुप्ता सर, हे सर्व सामान्यांचे समाजसेवकच. रांजल्या गाजल्यांना मदत करणे हा त्यांचा स्वभाव,त्याच अनुषंगाने कुष्ठरोग पीडित,ऋग्णांच्या मदतीसाठी कल्याण येथील के.एम.अग्रवाल कॉलेज ऑडिटेरियम मध्ये भारत सन्मान पुरस्कार सोहळा२०२६आयोजित करण्यात आला होता.हा सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. याप्रसंगी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले.आकर्षक नृत्य, पुरुष, महिलांसाठी मनोरंजनाचे खेळ, गौरी शिळकर हिचे गणपती वंदना,सुधाकर पाटील बुवा यांचे वासुदेव रुपी नृत्य, समता डान्स अकॅडमीच्या मुलांचा जोगवा,रिलस्टार स्वरा मुंढे हिचे कोळी नृत्य, गायिका मौमिता नायर आणि शर्मिला केसरकर याची श्रवणीय गाणी असे विविध सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाले.सर्व सहभागी कलाकारांना बक्षिसांची लयलूट करता आली.सर्व कलाकारांना ॲन्टी पायरेसी सेल मुंबई चे मुख्य तपासी अधिकारी राम जित(जितू) गुप्ता यांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली. सुग्रास जेवणाचा आनंद घेतल्यानंतर



पुरस्कार सोहळ्याला सुरुवात झाली.साहित्यिक,कवी, शैक्षणिक, सांस्कृतिक,कला, क्रिडा, सामाजिक, उद्योजक, पत्रकारिता, वैद्यकीय अशा विविध क्षेत्रातील प्रतिभावंत प्रज्ञावंतांना प्रमुख पाहुणे इंडियन एअर फोर्सच्या फ्लाइंग ऑफिसर इतिशा चौहान, मानवाधिकार जागतिक मानव कल्याण संस्था पुणे येथील संस्थापिका-अध्यक्षा प्रिती ताई सावंत,भारत विभुषण(गव्हरमेंट ऑफ पंजाब)एमएमआरडीचे स्थापत्य अभियंता डॉ.दिगंबर सिताराम तायडे, अभिनेत्री ए-स्टार टूर्स आणि ट्रॅव्हल्सच्या संस्थापिका अश्विनी अमित चुरी, जेष्ठ समाजसेविका मेहराजुनिसा अब्दुल शकील, श्री समर्पण ट्रस्टचे जितेंद्र जोशी, आदर्श शिक्षिका नसहत अंजुम इफ्तेकार अन्सारी यांच्या हस्ते पुरस्कार्तींना सन्मानित करण्यात आले. रामजित(जितू) गुप्ता सरांच्या सर्वच कार्यकर्त्यांनी विशेष मेहनत घेऊन कार्यक्रम यशस्वी केला.या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिलखेचक खुमासदार पध्दतीने निवेदिका बीना देवधर यांनी केले.

कार्यक्रमाचे उत्कृष्ट आयोजन, नियोजन, नाष्टा, पाणी, स्वादिष्ट जेवण याची उत्तम व्यवस्था,एसी हॉल, शिस्तबद्धता,आंनदीमय वातावरण याबद्दल प्रमुख पाहुणे व सर्व पुरस्कर्तींनी राम जित(जितू) गुप्ता सरांचे कौतुक व अभिनंदन केले.

# राज्यस्तरीय "भारत सन्मान पुरस्कार २०२६" ने प्रवीण नवरे सर यांचा गौरव

**दैनिक युवक आधार**
**मुंबई वार्ताहर** : इंडियन कॉपीराइट प्रोटेक्शन (अँटी पायरेसी सेल), मुंबई यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय "भारत सन्मान पुरस्कार २०२६" या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने रायगड जिल्ह्यातील ख्यातनाम समाजसेवक तथा आई-बाबा फाउंडेशन व्यसनमुक्ती केंद्राचे संस्थापक अध्यक्ष मा. प्रवीण सदाशिव नवरे यांना सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून त्यांना "राष्ट्रीय गौरव पुरस्कार" देखील प्रदान करण्यात आला आहे.

"सन्मान निष्ठेचा... गौरव कर्तृत्वाचा !" या ब्रीदवाक्याला साजेसा ठरणारा हा सन्मान प्रवीण नवरे सर यांच्या अथक परिश्रम, जिद्द आणि



समाजाप्रती असलेल्या निष्ठेचे प्रतीक आहे.

प्रतिकूल परिस्थितीतून मार्ग काढत, जिद्दीच्या जोरावर उभे राहून त्यांनी समाजसेवेचा एक वेगळा आदर्श निर्माण केला आहे. आई-बाबा फाउंडेशन व्यसनमुक्ती केंद्राच्या माध्यमातून त्यांनी हजारो युवकांना व्यसनाच्या अंधारातून बाहेर काढत नवजीवनाची दिशा दिली आहे.या केंद्रामध्ये आधुनिक वैद्यकीय उपचार, समुपदेशन (काउन्सेलिंग), योग, ध्यान, अध्यात्म आणि सांस्कृतिक उपक्रमांच्या साहाय्याने रुग्णांना सर्वांगीण पुनर्वसनाची संधी दिली जाते. व्यसनमुक्ती ही केवळ उपचाराची प्रक्रिया नसून मानसिक, शारीरिक आणि सामाजिक पुनर्बांधणीची एक व्यापक चळवळ आहे, याची जाणीव नवरे यांनी आपल्या कार्यातून करून दिली आहे.

योग, संस्कृती, अनुशासन आणि कौशल्य विकासाच्या माध्यमातून "निरोगी भारत" घडवण्याचा त्यांचा ध्यास असून, युवकांना सकारात्मक जीवनशैलीकडे वळवण्यात त्यांचे कार्य मोलाचे ठरत आहे.

रायगड जिल्ह्यातील व्यसनमुक्ती क्षेत्रातील एक नामांकित संस्था म्हणून आई-बाबा फाउंडेशन विविध सामाजिक उपक्रम राबवत असून, त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत अनेक मानाचे पुरस्कार त्यांना प्राप्त झाले आहेत.

प्रवीण नवरे हे एक अभ्यासू, कर्तव्यनिष्ठ आणि संवेदनशील समाजसेवक म्हणून ओळखले जातात. त्यांच्या या यशामुळे संपूर्ण रायगड जिल्ह्याचा मान उंचावला असून, समाजात प्रेरणेचा दीप प्रज्वलित झाला आहे.त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, पुढील वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## द ग तटकरे तळा महाविद्यालयात ऑनलाइन वेबिनार संपन्न

**दैनिक युवक आधार**
**तळा प्रतिनिधी** : तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे द ग तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालयात डेलनेट रिसोर्सेस ॲन्ड सर्व्हिस या विषयावर नुकतेच ऑनलाईन वेबिनार पार पडले.हा कार्यक्रम IQAC व ग्रंथालय विभागाच्या संयुक्त विद्यमाने १८ एप्रिल २०२६ रोजी आयोजित करण्यात आला होता.या वेबिनारसाठी DELNET, पुणे येथील Senior Network Assistant श्री. रोहिदास राठोड यांनी मार्गदर्शन करत DELNET च्या विविध सेवा, ई-जर्नल्स,



ई-बुक्स, इंटर लायब्ररी लोन व डिजिटल डेटाबेसचा प्रभावी वापर याविषयी सविस्तर माहिती दिली. त्यांनी प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे पोर्टलचा वापरही दाखवून दिला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. भरत चाळके यांनी केले, तर प्रस्तावना व परिचय ग्रंथपाल श्री. मनोज वाढवळ यांनी करून दिला. प्राचार्य डॉ. यादव एन. एस. यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करत डिजिटल ग्रंथालय सेवांचे महत्त्व अधोरेखित केले. शेवटी प्रा. विजय चव्हाण यांनी आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता केली. या वेबिनारला प्राध्यापक, विद्यार्थी व ग्रंथालय कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पनीर खाताय? ते दुधाचे आहे का ते तपासा !!; अन्न व औषधे प्रशासनाचे आवाहन

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे/प्रतिनिधी** : काही उपाहारगृहे, खाद्यगृहे आदी आस्थापनांत पनीरच्या नावाखाली चीज ॲनालॉग प्रकारातील पदार्थ दिला जाऊ शकतो. पनीर दुधाचे आहे का ते तपासणे आवश्यक आहे, असे आवाहन अन्न व औषध प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ हा जाहिरात व जनजागृती यांच्यादृष्टीने अत्यंत महत्त्वाचा कायदा असून सर्वसामान्य जनतेस सकस, निर्भय व सुरक्षित अन्नपदार्थ उपलब्ध करून देणे हा त्याचा प्रमुख उद्देश आहे.भारत हा दुग्ध उत्पादनात अग्रगण्य देश असून पनीर हा भारतीय आहाराचा एक महत्त्वाचा घटक आहे. पनीर केवळ चविष्ट नसून पोषणमूल्यांनी समृद्ध असल्यामुळे त्याचे आहारात विशेष स्थान आहे. पनीरमध्ये प्रथिने, कॅल्शियम, जीवनसत्त्वे आणि आवश्यक खनिजे मोठ्या प्रमाणात आढळतात. शाकाहारी लोकांसाठी पनीर हा प्रथिनांचा उत्तम स्रोत मानला जातो.

पनीर व चीज ॲनालॉगमध्ये मूलभूत फरक :

अन्न सुरक्षा व मानके (अन्नपदार्थ मानके व ॲडिटिव्ह नियम), २०११ मधील नियम २.१.११ नुसार "पनीर" हे केवळ दुधापासून बनविलेले पदार्थ आहे. परंतु "चीज ॲनालॉग" हा दूध व्यतिरिक्त इतर खाद्यतेल, स्टार्च, इमल्सिफायर व इतर घटक वापरून बनविलेला पदार्थ असून तो पनीरसारखा दिसतो पण "पनीर" नाही. एफएसएसएआयच्या मानकांनुसार हा "चीज ॲनालॉग" या प्रकारात मोडतो.

अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य यांच्या निदर्शनास आले आहे की काही रेस्टॉरंट/केटरर्स/हॉटेल्स/फास्ट फूड विक्रेते या आस्थापनांमध्ये अन्न पदार्थ तयार करताना चीज ॲनालॉगचा वापर मोठ्या प्रमाणात करण्यात येत असून याबाबत सदर आस्थापनांकडून ग्राहकांना पुरेशी माहिती उपलब्ध करून देण्यात येत नसल्यामुळे ग्राहकांची दिशाभूल व फसवणूक होत असल्याचे आढळून आले आहे. तसेच बाजारात काही ठिकाणी "नॉन डेअरी चीज", "चीज ॲनालॉग", "व्हेज चीज पदार्थ" किंवा "चीज" या नावाने किंवा तत्सम नावाने विक्री केली जात आहे, ज्यामुळे ग्राहकांची दिशाभूल होत आहे.

अन्न सुरक्षा व मानके कायद्यातील तरतुदी :

अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ चे कलम १८ (२) (ई) नुसार उपभोक्त्यांना ते जे अन्न खातात त्याबद्दल योग्य निर्णय घेण्यासाठी अन्न पदार्थांबाबत माहिती असणे आवश्यक आहे. तसेच अन्न सुरक्षा मानके (Labelling and Display Regulation) २०२० मधील chapter ३ मधील नियम २(ई) नुसार अन्न पदार्थांची ग्राहकांना विक्री करताना, पोषण संबंधित माहिती आणि त्यातील घटकांची माहिती, तसेच आरोग्य संदर्भात प्रकटन करणे आवश्यक आहे.

राज्य परवानाधारक चीज ॲनालॉगचे उत्पादक/पुरवठादार यांनी चीज ॲनालॉग विक्री/पुरवठा करताना Food Safety and Standards Act, 2006 च्या कलम २३ मधील तरतुदीनुसार अन्नपदार्थांचे पॅकेजिंग व लेबलिंग करताना



ग्राहकांची फसवणूक होणार नाही याची खात्री करणे आवश्यक आहे. तसेच Food Safety and Standards (Labelling and Display) Regulations, 2020 (General Labelling Requirements) नुसार विक्री केले जाणारे चीज ॲनालॉग हे स्पष्टपणे दर्शविणे बंधनकारक आहे. रेस्टॉरंट/हॉटेल्स/केटरर्स/फास्ट फूड विक्रेते या आस्थापनांनी जर चीज ॲनालॉग वापर करून अन्न पदार्थ तयार केले असतील तर त्याची विक्री करताना त्याबाबत स्पष्ट माहिती देणे आवश्यक आहे.

मेन्युफॅक्चर/इलेक्ट्रॉनिक डिस्प्ले बोर्ड इत्यादी वर सदर अन्न पदार्थ स्पष्टपणे प्रदर्शित करणे आवश्यक आहे.

**ग्राहकांनी घ्यावयाची काळजी :**

१. पनीर खरेदी करताना पॅकेज उत्पादनावरील लेबल काळजीपूर्वक तपासावे.

२. रेस्टॉरंटमध्ये पनीर खरेदी करताना विक्रेत्याकडे ते शुद्ध दुधापासून बनवलेले आहे का याची खात्री करावी. तसे नसल्यास टाळावे.

३. हॉटेलमधील मेनूकार्डवर पनीर व चीज ॲनालॉग हे दोन स्वतंत्र अन्न पदार्थ आहेत का याची खात्री करावी व त्याप्रमाणेच आवश्यक माहिती घेऊनच पदार्थ निवडावा.

४. ॲनालॉग हा आरोग्यास अपायकारक नसला तरी त्यातील घटक व पोषणमूल्ये पनीरपेक्षा वेगळी असतात. त्यामुळे ग्राहकांनी फसवणूक टाळण्यासाठी योग्य माहिती असणे आवश्यक आहे.

**अन्न व्यवसायिकांना निर्देश :**

राज्यातील रेस्टॉरंट/केटरर्स/हॉटेल्स/फास्ट फूड विक्रेते/चीज ॲनालॉगचे उत्पादक/पुरवठादार यांनी कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन केल्याचे आढळल्यास त्यांच्यावर अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६, नियम व विनियम अंतर्गत कठोर कारवाई करण्यात येईल.

हॉटेल/रेस्टॉरंट चालकांनी पनीर ॲनालॉग व चीज ॲनालॉग उत्पादनांचा वापर करून तयार केलेल्या पदार्थांची विक्री करताना सदर अन्न पदार्थांचे स्पष्टपणे उल्लेख करणे आवश्यक आहे.

ज्या अन्न व्यवसायिकांनी अन्न परवाना घेतला त्यावेळी त्यांनी जो मोबाईल/फोन संपर्क क्रमांक दिलेला आहे, त्या क्रमांकावर प्रशासनाकडून हॉटेल/रेस्टॉरंट चालकांना पनीर व चीज ॲनालॉग संदर्भात उपरोक्त नमूद करावयाचे कार्यवाही संदर्भात सूचना देण्यात आलेल्या आहेत.

तसेच, ज्या अन्न व्यवसायिकांनी परवाना घेताना स्वतःचा ई-मेल आणि मोबाईल क्रमांक दिलेला नाही व कोणत्या अन्य व्यक्तीचा मेलआयडी आणि मोबाईल नंबर दिलेला आहे, अशा अन्न व्यवसायिकांना स्पष्ट सूचना देण्यात येत आहे की त्यांनी तात्काळ आपल्या परवाना नोंदणीमध्ये स्वतःचा मेलआयडी आणि मोबाईल नंबर टाकावा अन्यथा त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.

अन्न व औषध प्रशासन ग्राहकांच्या आरोग्याबाबत दक्ष असून अन्नातील भेसळ व दिशाभूल करणाऱ्या प्रकारांना आळा घालण्यासाठी कटिबद्ध आहे.

ग्राहकांनी अशा प्रकारची दिशाभूल झाल्यास त्याबाबत तक्रार प्रशासनाच्या १८००-२२२-३६५ या टोल फ्री क्रमांकावर नोंदवावी असे आवाहन अन्न सुरक्षा आयुक्त श्री. श्रीधर डुबे-पाटील यांनी जनतेस केले आहे.

# मोबाईलच्या पडद्यामागे हरवलेली नाती आणि जबाबदारीची जाणीव”

आजचा विद्यार्थी अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात जगत आहे. मोबाईल, इंटरनेट आणि सोशल मीडियामुळे ज्ञानाच्या दारांचे जग उघडले आहे, पण त्याचबरोबर अनेक विद्यार्थी या साधनांच्या अति वापरामुळे आपल्या आयुष्याच्या मूलभूत मूल्यांपासून दूर जाताना दिसतात. विशेषतः, आई-वडिलांचा विश्वास, कष्ट आणि अपेक्षा यांची जाणीव कमी होत चालली आहे, ही चिंतेची बाब आहे.

आई-वडील आपल्या मुलांसाठी आयुष्यभर कष्ट करतात. त्यांच्या प्रत्येक त्यागामागे एकच उद्देश असतो मुलांचे उज्ज्वल भविष्य. ते आपल्या मुलांवर पूर्ण विश्वास ठेवतात, त्यांना स्वातंत्र्य देतात. पण काही विद्यार्थी या विश्वासाचा गैरफायदा घेतात. चुकीच्या मित्रांच्या संगतीत पडून, व्यसनांच्या आहारी जाऊन आणि वेळ वाया घालवून



ते स्वतःच्या भविष्यावरच घाला घालतात.

आई-वडिलांना फसवणे म्हणजे प्रत्यक्षात स्वतःच्या आयुष्यालाच फसवणे होय.

मोबाईलचा अतिरेक हा आजच्या समस्यांचा मुख्य केंद्रबिंदू बनला आहे. तासन्तास मोबाईलमध्ये रमून राहणारा विद्यार्थी घरातील आई-वडील, भाऊ-बहिण यांच्याशी संवाद साधायला विसरतो. एकाच घरात राहूनही नाती दूर जातात. मोबाईलमध्ये मिळणारा क्षणिक आनंद खरा समाधान देत नाही, पण कुटुंबातील प्रेम आणि संवाद आयुष्यभर साथ देतो.वाईट संगतीचा परिणामही तितकाच घातक आहे. चुकीच्या मित्रांच्या प्रभावामुळे विद्यार्थी चुकीच्या सवयी अंगीकारतो व्यसन, अभ्यासाकडे दुर्लक्ष, खोटे बोलणे आणि हळूहळू स्वतःचे भविष्य अंधारात ढकलतो. अशा वेळी आई-वडिलांचा विश्वास तुटतो आणि विद्यार्थ्याचे आयुष्यही दिशाहीन होते.

**यावर उपाय काय?**

- विद्यार्थ्यांनी सर्वप्रथम स्वतःच्या जबाबदारीची जाणीव ठेवली पाहिजे.
- आई-वडिलांच्या कष्टांचे मोल ओळखावे
- योग्य मित्रांची निवड करावी
- मोबाईलचा वापर मर्यादित ठेवावा
- कुटुंबासोबत संवाद वाढवावा
- स्वतःचे उद्दिष्ट निश्चित करून त्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करावेत
- विश्वास हा मिळवावा लागतो आणि टिकवावा लागतो.
- आई-वडिलांचा विश्वास जपणे ही प्रत्येक विद्यार्थ्याची नैतिक जबाबदारी आहे.

शेवटी, हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे की

“मोबाईल, मित्र किंवा क्षणिक आनंद यापेक्षा आई-वडिलांचे प्रेम, विश्वास आणि स्वतःचे भविष्य अधिक महत्त्वाचे आहे.”

विद्यार्थ्यांनी योग्य वेळी योग्य निर्णय घेतला, तरच त्यांचे आयुष्य उज्ज्वल होईल; अन्यथा, चुकीच्या वाटेवर गेलेले पाऊल भविष्यात पश्चात्तापाचे कारण ठरू शकते

**डॉ शहाजी चंदनशिवे**
**सहयोगी प्राध्यापक**
**प्राणीशास्त्र विभाग**
**शिक्षण महर्षी गुरुवर्य रा गे शिंदे महाविद्यालय परंडा**
**जिल्हा धाराशिव.**
**महाराष्ट्र राज्य**

# काँग्रेस देशभर आंदोलन करून मोदी सरकारच्या वारंवार मांडणाऱ्या खोटारड्या भूमिकेची पोलखोल करणार

**दैनिक युवक आधार**

**ठाणे वार्ताहर** : मोदी सरकारने लोकसभेत महिला बिल आणलेच नव्हते, भाजपने घटना दुरुस्ती बिल मंजुरीसाठी मांडले होते. संसदेत बहुमत नसतानाही घटना दुरुस्ती विधयक आणून काँग्रेसला बदनाम आणि लोकशाही संपविण्याचा डाव आखला होता. वास्तविक भाजपला महिला आरक्षण द्यायचेच नसून महिलांच्या आडून घटना दुरुस्तीचा घाट घालण्यात आला होता. काँग्रेस देशभर आंदोलन करून मोदी सरकारच्या वारंवार मांडणाऱ्या खोटारड्या भूमिकेचा पोलखोल करणार असल्याचे अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे कार्यकारणी सदस्य माजी मंत्री आरिफ (नसीम) खान यांनी आज ठाण्यात पत्रकार परिषेदेत सांगितले.




लोकसभेत २०२३ मध्ये महिला आरक्षण बिल काँग्रेसच्या पाठिंब्याने मंजूर झालेला आहे. असे असताना केवळ काँग्रेसला महिला विरोधी ठरविण्यासाठी खोटे बोलून जनतेची दिशाभूल करण्याचा डाव मोदी सरकारने कसा आखला आहे, याचा पोलखोल आज काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष माजी मंत्री नसीम खान यांनी पत्रकार परिषद घेऊन केला. महिला बिलाच्या निमित्ताने पुन्हा एकदा मोदी सरकारचा खोटेपणा दिसून आला आहे. सतत खोटे बोलून राजकारण करणारे जुमलेबाज असे भाजप सरकार असून चोर दरवाजातून संविधान कमजोर करण्याचा घाट घातला होता. हा धोका ओळखून काँग्रेस आणि इतर पक्षांनी घटना दुरुस्तीचे बिल नामंजूर करीत लोकशाही वाचविली आहे. आता मोदी सरकारचा निर्णय त्यांच्या अंगलटी आल्याने त्यांनी महिला आरक्षण नामंजूर झाल्याचा खोटा प्रचार सुरु केला आहे. महिला आरक्षण २०२३ मध्ये मंजूर झालेला असून हे आरक्षण तात्काळ लागू करावे आणि येणाऱ्या २०२९ च्या निवडणुकीत महिलांना समान संधी द्यावी, अशी मागणी काँग्रेसने यापूर्वीच केलेली आहे, असे ते म्हणाले. डेलिमिटेशनची प्रक्रिया पूर्ण करून त्याची अंमलबजावणी करावी, तशी प्रक्रिया न करता घटना दुरुस्तीच्या माध्यमातून सर्व अधिकार मोदी सरकारला हवे होते जेणेकरून आपल्या मर्जीनुसार मतदार संघाची निर्मिती करता येईल. हे विधयक मंजूर झाले असते तर लोकशाही धोक्यात आली असती म्हणून काँग्रेसने विरोध केल्याचे खान यांनी सांगितले. महिलांवरील अत्याचार रोखण्यास अपयशी ठरलेल्या भाजपने केंद्रात आणि राज्यात महिलांना मंत्री केले आहे? भाजपचे नेतेच महिलांवर अत्याचार करीत असताना ते का थांबविले जात नाहीत, असे प्रश्न करीत खान यांनी भाजपच्या दुटप्पी भूमिकेवर आसूड ओढले. यावेळी काँग्रेसचे शहर अध्यक्ष ॲड. विक्रांत चव्हाण, ठाणे ग्रामीण अध्यक्ष चेतनसिंह पवार आदी नेते उपस्थित होते.

# महात्मा ज्योतिबा फुले व डॉ . बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती व एशियन भीमपर्व न्यूज चॅनलच्या वर्धापन दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे** : भंडारा- साकोली येथील होमगार्ड परेड ग्राउंड वर महात्मा ज्योतिबा फुले व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त एशियन न्यूज भीम पर्व चॅनल चा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्घाटन ज्येष्ठ विचारवंत व साहित्यिक सुरेश खोब्रागडे यांच्या हस्ते करण्यात आले. तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विचारवंत प्राध्यापक शंकर बागडे होते .तर प्रमुख अतिथी म्हणून नगराध्यक्षा देवश्री कापगते, उपाध्यक्ष रोहिणी मुंगूलमारे, नगरसेवका मीना लांजेवार, नगरसेवका वैशाली लांजेवार ,नगरसेविका साहिली डोनोळे,नगरसेविका निर्मला नंदेश्वर ,नगरसेविका स्मिता सिडाम ,नगरसेविका रेणुका गणवीर, ब्ल्यू स्टार्म टीव्ही चॅनेल चे संपादक संजीव भांबोरे, प्रबोधनकार भावेश कोटांगले,




प्रबोधनकार सुभाष कोठारे, तनुजा नागदेवे, उपस्थित होते .यावेळी सर्व पाहुण्यांच्या उपस्थितीत महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. त्यानंतर संपूर्ण पाहुण्यांचे स्वागत गीताने व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर उपस्थित नगरसेविकांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक एशियन व भीम पर्व न्यूज चॅनेल चे मुख्य संपादक डी.जी रंगारी यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन पूजा वासनिक, शितल नागदिवे यांनी केले तर आभार दीपक मेश्राम यांनी मानले. सदर कार्यक्रमात शीतल नागदेवे व त्यांचा संच यांच्या प्रबोधनाचा कार्यक्रम घेण्यात आला. त्याचप्रमाणे सुभाष कोठारे नागपूर व त्यांच्या संच यांच्या भीम गीत प्रबोधनाचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी वंचित तर्फे भोजनदानाचा कार्यक्रम सुद्धा घेण्यात आला . कार्यक्रम यशस्वी करण्याकरता अश्विन रंगारी, जयेश नागदेवे ,उत्तमा गडपायले, स्वर्णमाला गजभिये, प्रज्ञा दिरपुडे, यांनी सहकार्य केले.

## रेल्वे अपघातात दोन्ही पाय हिरावले, पण जिद्दीने मातृत्व जिंकले

# खारघरच्या मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये दिला 3.2 किलोच्या वजनाच्या निरोगी बाळाला जन्म

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई प्रतिनिधी** : अत्यंत दुर्मीळ आणि गुंतागुतीच्या अशी गर्भधारणा असलेल्या तसेच रेल्वे अपघातात दोन्ही पाय गमावलेल्या एका डॉक्टर महिलेने मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये 3.2 किलो वजनाच्या निरोगी बाळाला जन्म दिला. प्रगत वैद्यकीय उपचार आणि तज्ज्ञांच्या टीमवर्कमुळे आई आणि बाळ दोघेही सुरक्षित आहेत.धाडस आणि अत्याधुनिक वैद्यकीय सेवेच्या एक प्रेणादायी उदाहरण ठरले आहे. *प्रसूती तज्ञ डॉ. स्वप्ना दहे, स्त्रीरोग तज्ञ डॉ. अनुरंजिता पल्लवी आणि डॉ. संतोष जयभाये यांच्या टीमने, गुंतागुंतीची गर्भधारणा यशस्वीरित्या हाताळली.* रुग्ण डॉ. रोशन शेख, यांनी यापूर्वी एका भीषण रेल्वे अपघातात आपले दोन्ही पाय गमावले होते. यानंतर शारीरिक आणि भावनिक आव्हानांवर मात करत त्यांनी मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये सिझेरियन शस्त्रक्रियेद्वारे ३.२ किलो वजनाच्या एका निरोगी बाळाल जन्म दिला.डॉ. रोशन शेख यांचा मातृत्वाचा प्रवास संघर्षमय असूनही प्रत्येकासाठी प्रेरणादायी ठरत आहे. रेल्वे अपघातानंतर त्यांनी त्यांचे पुन्हा आयुष्य नव्याने उभे केले, कृत्रिम पायांच्या साहाय्याने चालु लागल्या आणि दैनंदिन आयुष्यातील कित्येक आव्हानांना धाडसाने सामोरे गेल्या. इतकंच नाही तर त्यांनी



एमबीबीएस आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करत बांद्रा येथील गुरु नानक हॉस्पिटलमध्येही सेवा देण्यास सुरुवात केली. स्वतःच्या संघर्षाला त्यांनी इतरांसाठी प्रेरणादायी उदाहरण तयार केले.डॉ. रोशन शेख म्हणाल्या,* मी गर्भवती असल्याचं कळणं हा माझ्या आयुष्यातील अत्यंत भावनिक क्षण होता. अनेक संकटांनंतर मला हा दैवी आशीर्वाद वाटला आणि यामुळे माझ्या आयुष्याला नवे वळण मिळाले. मात्र त्याचवेळी आनंदसोबतच भीती आणि आत्मविश्वासाचा अभाव जाणवत होता. त्यामुळे मी माझी मैत्रीण डॉ. स्वप्ना दहे हिच्याशी संपर्क साधला आणि तिथून पुढे माझा गर्भधारणेचा प्रवास मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये सुरू झाला.या आनंदासोबतच डॉ. रोशन यांना अनेक आव्हानांचाही सामना करावा लागला. कृत्रिम पायांमुळे दीर्घकाळापर्यंत चालणे, जिने चढणे, शारीरीक संतुलन राखणे आणि घरकाम करणे हे सर्वच अवघड होतं. त्यातच गर्भावस्थेदरम्यान त्यांना गर्भावस्थेतील मधुमेहाचे (Gestational Diabetes) निदान झाले होता. तरीही कुटुंबाचा पाठिंबा, सकारात्मक दृष्टिकोन आणि नियमित वैद्यकीय तपासणीमुळे त्यांनी प्रत्येक अडथळ्यावर मात केली.

खारघर येथील मेडिकव्हर हॉस्पिटल स्त्रीरोग तज्ञ डॉ. अनुरंजिता पल्लवी म्हणाल्या,* हे अत्यंत गुंतागुंतीचे प्रकरण होते. रुग्णाने दोन्ही पाय गमावल्याने कृत्रिम पायांच्या आधाराने शारीरक हालचाल करणे आणि गर्भधारणेचं व्यवस्थापन करणे अधिक आव्हानात्मक होतं. त्यातच गर्भावस्थेतील मधुमेहामुळे आई आणि बाळासाठी धोका वाढू शकत होता. त्यामुळे त्यांना काटेकोरपणे आहार घेणे आणि नियमित तपासणी करण्याची आवश्यकता होती.

प्रसूती तज्ञ डॉ. स्वप्ना दहे म्हणाल्या,* संपूर्ण गर्भावस्थेत रुग्णाने अत्यंत सकारात्मकता आणि धैर्य दाखवले. नियमित तपासणी, योग्य औषधोपचार आणि वैद्यकिय सल्ल्याचं काटेकोर पालन करण्यात आलं. ॲनेस्थेशिया तज्ज्ञ, नवजात शिशु तज्ज्ञ, न्यूरोसर्जन यांची टीम सज्ज होती. आई आणि बाळाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने नियोजित सिझेरियन करण्यात आलं आणि निरोगी बाळाचा जन्म झाला. हा क्षण आमच्यासाठीही अत्यंत भावनिक होता. प्रसूतीनंतर 2-3 दिवसांतच रुग्णाला हालचाल सुरू करणं शक्य झालं, ज्यामुळे रक्ताच्या गाठी होण्याचा धोका कमी होतो आणि रुग्ण जलद बरा होतो.

त्या पुढे म्हणाल्या, आई आणि बाळ दोघांनाही चार दिवसांनंतर घरी सोडण्यात आले. विशेष म्हणजे सिझेरियननंतरही फिजिओथेरपीच्या मदतीने त्या कृत्रिम पायांच्या साहाय्याने चालू शकल्या. याचून त्यांची जिद्द आणि दांडगा आत्मविश्वास दिसून येतो.

आपला आनंद व्यक्त करताना *डॉ. रोशन शेख म्हणाल्या,* हा माझ्या आयुष्यातील सर्वात कठीण पण सुंदर प्रवास होता. दोन्ही पाय गमावल्यानंतर पुन्हा उभं राहणं आणि आई होणं हा प्रवास शब्दात मांडणं कठीण आहे. भीती होती, अनिश्चितता होती, पण मी आशा सोडली नाही. आज माझ्या मुलीला हातात घेतल्यानंतर हा सगळा संघर्ष सार्थकी लागल्यासारखं वाटतं. डॉक्टर आणि हॉस्पिटलची संपूर्ण टिम माझ्यासाठी खुप मोठा आधार ठरले.मेडिकव्हर हॉस्पिटल नवी मुंबईचे केंद्र प्रमुख संदीप जोशी म्हणाले,* हे प्रकरण मानवी जिद्दीचं आणि प्रगत, संवेदनशील आरोग्यसेवेचं उत्कृष्ट उदाहरण ठरले आहे.

अशा उच्च-जोखमीच्या गर्भधारणांमध्ये केवळ वैद्यकीय कौशल्यच नव्हे तर भावनिक आधार आणि टीमवर्कही अत्यंत महत्त्वाचं असतं. आम्ही प्रत्येक रुग्णाला सुरक्षित मातृत्व आणि सर्वोत्तम सेवा देण्यासाठी आम्ही नेहमीच प्रयत्नशील आहोत.